सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. ०८ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ३६ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

### पहलगाम हल्ल्याचा बदला
# पाकिस्तानमधील ९ ठिकाणांवर एअर स्ट्राईक

## जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबा सारख्या दहशतवादी संघटनांची ठिकाणे उद्ध्वस्त

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- पहलगाम हल्ल्याचा बदला म्हणून भारताने पाकिस्तानच्या अनेक ठिकाणावर बुधवारी (दि.७) एअर स्ट्राईक केला. भारताने बुधवारी ऑपरेशन सिंदूरच्या द्वारे अनेक दहशतवादी ठिकाणांना लक्ष्य करून हवाई हल्ले केले. या हल्ल्यात ९ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त झाली. या कारवाईत ३ जणांचा मृत्यू तर १२ जण जखमी असल्याचे वृत आहे. स्वतः पंतप्रधान मोदी या ऑपेरेशनवर जवळून लक्ष ठेवून होते.

पहलगाम हल्ल्याच्या १५ दिवसांनंतर, भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मधील ९ दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. बुधवारी (दि.७) रात्री १.३० वाजता बहावलपूर, मुरीदके, बाग, कोटली, मुझफ्फराबाद यासह नऊ ठिकाणी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत हल्ले करण्यात आले. ही तीच ठिकाणे आहेत जिथून भारतावर दहशतवादी हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी केली जात होती. एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार, लष्कर आणि जैशचे मुख्यालय उद्ध्वस्त करण्यात आले आहे.

भारतीय हवाई दलाच्या मिराज-२००० आणि सुखोई-३० एमकेआय सारख्या प्रगत लढाऊ विमानांनी बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबाद भागांना लक्ष्य करत ती उद्ध्वस्त केली. हे भाग बऱ्याच काळापासून जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबा सारख्या दहशतवादी संघटनांचे गड मानले जातात.

भारताच्या हवाई हल्ल्यानंतर पाकिस्तानी सैन्याचेही विधान समोर आले आहे. पाक सैन्याने सांगितले की, ६ ठिकाणी २४ हल्ले करण्यात आले. यामध्ये ८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ३३ जण जखमी झाले आहेत.


पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः रात्रभर ऑपरेशन सिंदूरवर सतत लक्ष ठेवून होते. या कारवाईअंतर्गत एकूण ९ ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले आणि सर्व हल्ले पूर्णपणे यशस्वी झाले.




## दहशतवाद्यांचा खात्मा आणि पहलगाम पीडितांच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठीच ऑपरेशन सिंदूर, लष्कराने केली भूमिका स्पष्ट

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याचे तपासातून पुढे आले आहे. या हल्ल्यामागे पाकिस्तान दहशतवाद्यांचा हात असल्याचे ठोस पुरावे भारताकडे आहेत. हल्यामागील हल्लेखोरांची ओळख पटली आहे. त्यामुळे दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठीच भारतीय लष्कराकडून ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आल्याचे भारतीय लष्कराच्या संयुक्त पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

पाकिस्तानने आतापर्यंत भारतावर केलेल्या हल्ल्यांचा व्हिडिओ दाखवून पत्रकार परिषदेला आज (दि.७) सुरूवात करण्यात आली. यानंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले, मुंबईमधील २६/११ हल्लानंतर पहलगाममधील हा सर्वात मोठा हल्ला होता. यामध्ये २६ भारतीय आणि १ नेपाळमधील एक नागरिक मारले गेले. हा हल्ला सर्वात क्रूर होता. लष्कर ए तोयबाच्या टीआरएएफ दहशतवादी संघटनेनेच हा भ्याड हल्ला केल्याचे मिस्त्री यांनी स्पष्ट केले. भारतीय लष्कराची संयुक्त पत्रकार परिषद आज (दि.७) पार पडली. यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी ऑपरेशन सिंदूरची सर्व माहिती सांगितली. पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले, भारताची कारवाई दहशतवादविरोधीच करण्यात आली आहे. दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठीच ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले. भारताने दहशतवादविरोधात आपल्या अधिकारांचा वापर केला आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणतात, ''दहशतवादी कारवायांवर लक्ष ठेवणाऱ्या आमच्या गुप्तचर संस्थांनी असे सूचित केले आहे की भारतावर आणखी हल्ले होऊ शकतात आणि त्यांना थांबवणे आणि त्यांचा सामना करणे आवश्यक वाटले.'' यानंतर पाकिस्तानने आगळीक केल्यास भारत चोख प्रत्युत्तर देणार, पत्रकार परिषदेतून पाकिस्तानला इशारा देखील देण्यात आला आहे.त्यांच्या नंतर कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या की,



पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी आज मध्यरात्री पाकिस्तानवर हल्ला केला. भारताने केलेल्या कारवाईत पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यात आले. पाकिस्तानात गेल्या तीन दशकांपासून दहशतवादी प्रशिक्षण दिले. ''पहलगाम हल्ल्यातील पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले. ९ दहशतवादी तळ पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यात आले. ही कारवाई पहाटे १.०५ ते १.३० वाजेपर्यंत, एकूण २५ मिनिटे चालली. दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे आणि लाँच पॅडवर हल्ला करून ते नष्ट करण्यात आले. या हल्ल्यात कोणत्याही प्रकारे निर्दोष नागरिकांना लक्ष्य करण्यात आले नाही. मार्च २०२५ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील चार सैनिक शहीद झाले. त्याला पाकिस्तानमधील एका दहशतवादी छावणीत प्रशिक्षण देण्यात आले होते. मुंबई दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांनाही लक्ष्य करण्यात आल्याचे सोफिया कुरेशी म्हणाल्या.

पाकिस्तान आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतावाद्याच्या मुद्द्यावर दिशाभूल करतं. टीआरएफने पहलगाम हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. टीआरएफ ही संयुक्त राष्ट्रामध्ये बंदी असलेली संघटना असल्याचेही ते म्हणाले. २५ एप्रिल रोजी, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या मीडिया रिलीजमधून टीआरएफचा संदर्भ काढून टाकण्यासाठी पाकिस्तानने केलेल्या दबावाकडे दुर्लक्ष करता कामा नये. पहलगाम दहशतवादी हल्ल्यामुळे पाकिस्तानचे दहशतवाद्यांशी असलेले संबंध उघड झाले आहेत...'' असे ते म्हणाले.

### सैन्याने अचूक ऑपरेशन केले-राजनाथ सिंह

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह म्हणाले- एका अर्थाने पाहिले तर आपण असे म्हणू शकतो की आपल्या सैनिकांनी अचूकता आणि मानवता दाखवली. मी सैन्याचे अभिनंदन करतो. सैन्याने आपल्या लोकांना मारणाऱ्या दहशतवाद्यांचे छावण्या उद्ध्वस्त केल्या. यामध्ये कोणत्याही नागरिकाचे नुकसान झाले नाही. राजनाथ बीआरओ स्थापना दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

### आपल्या सशस्त्र दलाचा अभिमान -राहुल गांधी

भारतीय सेनेनं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मिरमध्ये राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर बोलताना काँग्रेस नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपली प्रतिक्रिया देत भारतीय सेनेचे कौतुक केलं आहे. यात ते म्हणाले की, आपल्या सशस्त्र दलांचा अभिमान आहे. जय हिंद! अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. तर ऑपरेशननंतर लगेचच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी एक्स वर ''भारत माता की जय'' पोस्ट केले, तर भारतीय सैन्याने म्हटले आहे की ''न्याय मिळाला.''

### आमच्यासाठी राष्ट्रीय हित सर्वोच्च- मल्लिकार्जुन खरगे

भारतीय सैन्याच्या या शौर्यपूर्ण कामगिरीबाबत बोलताना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रतिक्रिया देत म्हटले आहे की, पाकिस्तान आणि पीओकेमधून होणाऱ्या सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध भारताचे एक अढळ राष्ट्रीय धोरण आहे. पाकिस्तान आणि पीओकेमध्ये दहशतवादी तळ रोखणाऱ्या भारतीय सशस्त्र दलांचा आम्हाला खूप अभिमान आहे. आम्ही त्यांच्या दृढनिश्चयाचे आणि धाडसाचे कौतुक करतो.

## निमलष्करी दलांतील सर्व जवानांच्या सुट्ट्या रद्द, तात्काळ कर्तव्यावर हजर व्हावं लागणार; 'ऑपरेशन सिंदूर'नंतर गृहमंत्रालयाचा आदेश

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय हवाई दलाने मध्यरात्री 'एअर स्ट्राईक' करत दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिलं आहे. पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरच्या हद्दीत 'एअर स्ट्राईक' करत ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले आहेत.

दरम्यान पाकव्याप्त जम्मू-काश्मीरच्या हद्दीत भारताने 'एअर स्ट्राईक' करत नऊ दहशतवादी छावण्यांवर हल्ला केल्यानंतर काही तासांतच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सर्व निमलष्करी दलांच्या प्रमुखांबरोबर एक बैठक घेत महत्वाचे आदेश दिले आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्करातील सर्व जवानांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

रजेवर असलेल्या सर्व जवानांना तात्काळ कर्तव्यावर हजर व्हावं लागणार आहे. या संदर्भातील निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिले आहेत. या संदर्भातील वृत्त सूत्रांच्या हवाल्याने इंडियन एक्सप्रेसने दिलं आहे. या बरोबरच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर जम्मू आणि काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी संपर्क साधत सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या संदर्भातही महत्वाचे आदेश दिले आहेत.

तसेच सर्व केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांच्या प्रमुखांना रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांना परत बोलावण्याचे आदेश अमित शाह यांनी दिले आहेत. या बरोबरच देशातील अंतर्गत सुरक्षा परिस्थितीचाही आढावा घेण्यासह उच्च सुरक्षा अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## देशभरातील १८ विमानतळ तात्पुरते बंद; २०० हून अधिक विमान उड्डाणे रद्द

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- भारत-पाकिस्तानमधील तणावाचा परिणाम विमान वाहतूकीवर झाला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर देशभरातील २०० हून अधिक विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. आणि श्रीनगरसह किमान १८ विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. हवाई क्षेत्रातील निर्बंधामुळे हा परिणाम झाला असल्याचे विमान वाहतूक कंपन्यांनी सांगितले आहे. एअर इंडिया, इंडिगो, स्पाइसजेट, एअर इंडिया एक्सप्रेस, अकासा एअर आणि काही परदेशी विमान कंपन्यांनी विविध विमानतळांवरून सेवा रद्द केल्या आहेत.

सूत्रांनी सांगितले की, देशाच्या उत्तर आणि पश्चिम भागातील किमान १८ विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आले आहेत. या विमानतळांमध्ये श्रीनगर, लेह, जम्मू, अमृतसर, पठाणकोट, चंदीगड, जोधपूर, जैसलमेर, शिमला, धर्मशाळा आणि जामनगर यांचा समावेश आहे, असे सूत्रांनी सांगितले.

इंडिगोने हवाई क्षेत्रावरील निर्बंधांमुळे अमृतसर आणि श्रीनगरसह विविध विमानतळांवरून १६५ हून अधिक देशांतर्गत उड्डाणे रद्द करण्याची घोषणा केली. सरकारच्या हवाई क्षेत्रावरील निर्बंधांवरील अधिसूचनेमुळे, १० मे २०२५ च्या भारतीय वेळेनुसार सकाळी ५.२९ वाजेपर्यंत अनेक विमानतळांवरून १६५ हून अधिक इंडिगो उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत, असे विमान कंपनीने एका निवेदनात म्हटले आहे. इंडिगोने म्हटले की, प्रभावित प्रवाशांना पुढील उपलब्ध सेवेवर त्यांच्या विमानाचे वेळापत्रक बदलण्याचा किंवा कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता त्यांचे तिकीट रद्द करण्याचा पर्याय आहे. पूर्ण पैसे परतफेड केले जातील.

एअर इंडियाने जम्मू, श्रीनगर, लेह, जोधपूर, अमृतसर, भुज, जामनगर, चंदीगड आणि राजकोटला जाणारी आणि येथून येणारी उड्डाणे स्थगित केली आहेत. एअर इंडियाच्या विमानांची उड्डाणे १० मे रोजी सकाळी ०५:२९ वाजेपर्यंत रद्द करण्यात येत आहेत, असे एअर इंडियाने म्हटले आहे.

स्पाइसजेट विमान वाहतूक कंपनीने म्हटले की, उत्तर भारतातील धर्मशाळा, लेह, जम्मू, श्रीनगर आणि अमृतसर पुढील सूचना येईपर्यंत बंद आहेत. बाधित प्रवाशांना पूर्ण परतफेड मिळविण्याचा किंवा पर्यायी विमान पुन्हा बुक करण्याचा पर्याय आहे. आकासा एअरने श्रीनगरला जाणारी आणि येणारी सर्व उड्डाणे रद्द केली, तर स्टार एअरने नांदेड, हिंडन, आदमपूर, किशनगड आणि भुजला जाणारी सर्व उड्डाणे दिवसभरासाठी स्थगित केली. भारत पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर, आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनी पाकिस्तानी हवाई क्षेत्र टाळण्यासाठी डझनभर उड्डाणे रद्द केली आहेत.

फ्लाइट रडार २४ कडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळपर्यंत पाकिस्तानला जाणारी किंवा येणारी किमान ५२ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. भारतातील सर्वात व्यस्त दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर मध्यरात्रीपासून किमान ३५ उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. बदलत्या हवाई परिस्थितीमुळे दिल्ली विमानतळावर काही उड्डाणांवर परिणाम झाला आहे, असे दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने एक्स वरील पोस्टमध्ये म्हटले.

## कृषी सहाय्यकांचे कृषी कार्यालया समोर ठिय्या आंदोलन




कन्नड दि.७ (प्रतिनिधी)- तालुक्यातील कृषी सहाय्यक संघटनेच्या वतीने दि.७ रोजी सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत विविध मागण्यांसाठी तालुका कृषी अधिकारी कन्नड कार्यालया समोर एक दिवसीय धरणे आंदोलन केले. यावेळी आंदोलन सुरू असताना पावसाने हजेरी लावली, मात्र कृषी सहाय्यकाने जागा न सोडता नेटाने धरणे आंदोलन टिकवून ठेवले. कृषी अधिकारी यांना निवेदन देऊन शासन दरबारी .कृषी सेवक कालावधी रद्द करून कृषी सेवकांना नियमित कृषी सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी,कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करण्यात यावे, कृषी विभागाचे कामकाज कालानुरूप ऑनलाइन व डिजिटल होत असताना सुद्धा कृषी सहायकांनी वारंवार मागणी करूनही शासनामार्फत लॅपटॉप दिले जात नाही, सिल्लोड तालुक्यातील कृषी सहाय्यक यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रकरणा नंतर सदर प्रकरणाची विभागीय चौकशी पूर्ण होऊन सुद्धा संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही झालेली नाही. त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. यासह विविध मागण्या करण्यात आल्या या निवेदनावर कृषी सहाय्यक संघटना तालुकाअध्यक्ष पि.डी.पुरी, सचिव वैभव माने, कृषी सहाय्यक संदीप शिरसाट यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहे

## भारताने सतर्क राहावे-शरद पवार

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- भारतीय सैन्य दलांच्या ऑपरेशन सिंदूर नंतर शरद पवारांनी सकाळी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या सोबत असल्याचं म्हटलं. गेल्या आठवड्यात जे काही काश्मीर मध्ये घडले त्यामुळे साहजिक देशात लोकांमध्ये एक अस्वस्थता होती. निष्पाप लोकांना गोळ्या घालतात, २६ लोक मारली गेली. भारत आणि पाकिस्तान यांमध्ये पीओके जो त्यांनी ४८ मध्ये घेतला तिथेच हे हल्ला करण्याचे स्थान केंद्रित केल्याचं दिसत आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचे कॅम्प आहेत, तिथे दारू गोळा ठेवला जातो आणि सगळी मदत पाकिस्तान करते, असं शरद पवार म्हणाले. हिंदुस्थान आणि पाकिस्तान बॉर्डर ओलांडून आपण जाऊ इच्छित नव्हतो आणि त्याची काळजी भारतीय हवाई दलाने घेतली आहे. काश्मीर मधील विधानसभेत हल्ल्याच्या विरोधात ठराव झाला, ओमर अब्दुल्ला यांनी स्वच्छ भूमिका दहशतवाद विरोधात घेतली, असं शरद पवार म्हणाले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवीन पोलीस वसाहतीचे भूमिपूजन

अहिल्यानगर दि.६ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस मुख्यालय अहिल्यानगर येथे १०२ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या आणि पोलीसांसाठी ३२० नवीन निवासस्थाने असलेल्या वसाहतीचे, तसेच राखीव पोलीस निरीक्षक कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.



यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया,जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव आदी उपस्थित होते.

ावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नव्याने उभारण्यात येणारी पोलीस वसाहत व राज्य राखीव पोलीस निरीक्षक कार्यालयाच्या प्रशासकीय इमारती विषयी माहिती जाणून घेतली.

पोलीस वसाहतीच्या नवीन इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर ८ निवासस्थाने याप्रमाणे ८० निवासस्थाने असून अशा एकूण चार इमारती उभारण्यात येत आहेत. पोलीस अंमलदार निवासस्थानामध्ये २ बेडरुम, हॉल, किचन असा ५० चौ.मी क्षेत्रफळ आहे. पार्किंगमध्ये सर्वत्र सोलरद्वारे विद्युत पुरवठा असून अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, सांडपाणी शुद्धीकरण व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था आदी सुविधा असणार आहेत. नव्याने बांधण्यात येणाऱ्या प्रशासकीय इमारतीमध्ये शस्त्रागार, राखीव पोलीस निरीक्षक कार्यालय, टेंट हाऊस, क्रीडा साहित्य कक्ष, बँड रुम, बेल ऑफ आर्मस् आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

## संक्षिप्त

### नळपट्टी व मालमत्ता कर भरून नगरपंचायत सहकार्य करावे- मुख्याधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**

मंठा नगर पंचायत कार्यालयामार्फत शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, आपल्या कडील मालमत्ता कर, पाणी पट्टी कराची रक्कम नगर पंचायत कार्यालयात भरावी. मालमत्ता कर व पाणी पट्टी कर न भरल्यास आपणास नागरी सुविधा देतांना अडथळ निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांनी मालमत्ता कर व पाणी पट्टी कर भरून नगर पंचायतला सहकार्य करावे. मालमत्ता कर व पाणी पट्टी कर न भरल्यास आपणावर दंडात्मक कारवाई तसेच पाणी पट्टी न भरल्यास नळ जोडणी बंद (कट) करण्यात येईल याची नोंद घ्यावी. असे आवाहन मंठा नगर पंचायत मार्फत करण्यात येत आहे.

### ज्ञानसागर महाविद्यालयाचा १२ वी चा निकाल १००% टक्के

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षांचा निकाल


HARSHADA SUNILKUMAR WAYAL


PATIL SAMRUDDHI SUNIL
DATE-27.02.2025

सोमवारी (दि.५) दुपारी ऑनलाईन पध्दतीने जाहिर करण्यात आला. त्यात ज्ञानसागर कनिष्ठ महाविद्यालय जाफ्राबाद विज्ञान शाखेचा निकाल १००% टक्के तर कला शाखेचा निकाल ९८% टक्के लावत महाविद्यालयाने यावर्षीही उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.यामध्ये विज्ञान शाखेतुन कु.हर्षदा सुनिलकुमार वायाळ या विद्यार्थीने ८०.६० टक्के गुण संपादन करुन महाविद्यालयातुन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान मिळविला आहे.तर कु.समृध्दी सुनिल पाटील हिने ७७.५० टक्के व्दितीय क्रमाक ,कु.ज्ञानेश्वरी संतोष वायाळ हिने ७३.३३ टक्के गुण संपादन करुन तृतीय क्रमाक मिळविला आहे.या यशाबदल संस्थेचे अध्यक्ष सुरेशजी दिवटे,सचिव बाबुराव जाधव,मुख्याध्यापक निवृत्ती दिवटे,प्राचार्य विलास नवले,प्रा. आप्पासाहेब सपाटे,प्रा.रमेश शेळके,प्रा.सुजीत सोनोने,प्रा.कैलास चिंचोले,प्रा.निवृत्ती वायाळ,प्रा.पांडुरंग राऊत,प्रा.अजीत म्हस्के यांच्यासह शिक्षके शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

### पदमपाणी प्रतिष्ठानच्या पुरस्काराचे थाटात चार मे रोजी बीड येथे संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबड /प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथील रहिवासी असलेले वसंतराव किसनराव गायसमुद्रे यांना पद्मपाणी प्रतिष्ठान बीड तर्फे पद्मपाणि उत्कृष्ट उद्योजक राज्य राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झालेला पद्मपाणी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी दिली आहे.दि.४ मे रोजी या पुरस्काराचे वितरण यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे मान्यवरांच्या हस्ते झाले आहे. गेल्या १७ वर्षापासून संविधान दिनानिमित्त राजकीय, सामाजिक, कृषी, प्रशासन, जलसिंचन, उद्योग आदी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात आला असे तरकसे यांनी सांगितले. त्याचबरोबर अंबड चे माजी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनासुद्धा प्रशासकीय कामांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना सुद्धा प्रशासकीय पद्मपाणी राज्य पुरस्कार दिला आहे.. वसंतराव गायसमुद्रे हे गेल्या पंधरा वर्षांपासून कृषी सेवा केंद्र चालवत आहे यामध्ये त्यांनी ग्राहकांची विश्वासार्हता, सचोटी, पारदर्शकता शेतकऱ्यांच्या समस्यांचे समाधान त्यांनी मेहनतीने केलेले आहे... वसंतराव गायसमुद्रे यांनी सांगितले की हा पुरस्कार केवळ शेतकऱ्यांचा विश्वास जिंकल्यामुळे तसेच वेगवेगळ्या प्रकारे व्यवसायामध्ये पंचक्रोशी त वाढ केल्यामुळे मिळाला आहे तसेच मी नेहमी ग्राहक हेच दैवत असे मानून व्यवसाय करत असतो त्यामुळे त्यांनी सर्वांचे धन्यवाद व्यक्त केले. वसंतराव गायसमुद्रे यांचे सिद्धार्थ इंगळे, अनिल खंडागळे सर, सुदर्शन गावडे सर, मिलिंद बेडेकर इत्यादी मित्रपरिवार आणि गावकऱ्यांनीअभिनंदन केले आहे.



# परतूर - मंठा मतदारसंघाची टँकरमुक्तीकडे वाटचाल ;

## लोणीकरांची वॉटरग्रीड योजना ठरली मतदारसंघासाठी जल नवसंजीवनी

### मंठा तालुक्यात दोन गावांचे टँकरसाठी अर्ज तर परतुर तालुका टँकरमुक्तच

### मतदारसंघात २२४ गावांची संख्या आसताना मंठा तालुक्यातील केवळ २ गावांचा टँकरसाठी प्रस्ताव







मागील काळात आमदार बबणराव लोणीकर यांच्या तृत्वाखाली पावसाचा पडणारा थेंब न थेंब शेत शिवारात अडविला जावा म्हणून जलयुक्त शिवार योजना मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आणि यात लोकसहभाग विविध सामाजिक संस्था मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला होता . यात प्रामुख्याने छोट छोटी नदी , नाले ,ओढे यांची खोलिकरण रुंदीकरण करण्यात आले आहे तसेच कोल्हापुरी बंधारे बांधण्यात आले होते . यामुळे पाऊसाचे पाणी जमिनित मुरले तर लाखो लिटर पाणी अडवण्यात आल्याने जमिनीवर पाणी पातळी वाढली आहे . आणि पाणी टंचाई दूर करण्यासाठी मदद झाली .

माजी मंत्री आमदार बबणराव लोणीकर यांचा मास्टरप्लॅन मतदार संघातील वाटर ग्रिड योजना परतुर - मंठा तालुक्यातील अनेक गावांना जोडली गेलेली आहे . या वाटर ग्रिड योजनेचे शुद्ध पाणी अनेक गावांना पाणीपुरवठा केला जात आसल्याने यावर्षी परतुर मंठा तालुक्यातील जणतेला आ लोणीकरांची वाटर ग्रिड योजना जलनवसंजिवनी ठरली आहे . तर अनेक गावांतील ग्रामस्थांनी आमदार लोणीकरांचे आभार मानले आहेत .

**तभा वृत्तसेवा**
**जालना / सुरेश कवडे पाटील**

सण २०१८ मध्ये सालमानात पाऊसाने दडी मारल्यामुळे मतदारसंघात भिषन पाणीटंचाई निर्माण झाली होती . परतूर मंठा मतदार संघातील मंठा तालुक्यात दरवर्षीच पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत होते . मंठा तालुक्यातील अनेक गावांत पिण्याच्या पाण्याचे टँकर आले कि महिला पुरुषांची पाण्यासाठी झुंबड उडत असे . हे नेहमीचेच चित्र पहायला मिळत होते . मात्र मागील दोन वर्षापासुन परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघांची टँकरमुक्तीकडे वाटचाल करीत आहेत . गेल्यावर्षी पावसाळ्यात पाऊसमान चांगला झाला आसल्याने परतीच्या पाऊसाने नदी नाले तसेच पाझर तलाव धरणे ओअर फ्लो होऊन तुडुंब भरून वाहत होते . त्यामुळे मतदार संघात जलस्तर वाढला आहे . व जण सामान्यांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला आणि शेतीतील सिंचनाचा प्रश्न हि मार्गी लागला तर यंदाचा उन्हाळा संपत आला आहे तरी परतूर तालुक्यात एकही टँकर सुरू झालेले नाही . परतुर - मंठा मतदारसंघात एकुण २२४ गावे आहेत त्यापैकी मंठा तालुक्यात केवळ दोन ग्रामपंचायतीचे पाण्याच्या टँकरकरिता प्रस्ताव पंचायत समितीच्या पुरवठा विभागाला सादर करण्यात आले आहे . परतूर तालुका पुर्णपणे टँकरमुक्त झाला असून आज रोजी एकही गावाची पिण्याच्या पाण्यासाठी अर्ज किंवा टँकरसाठी मागणी करण्यात आलेली नसल्याने परतुर तालुका टँकरमुक्त तालुका झाला आहे .

### सैन्यदलांची ताकद, राजकीय इच्छाशक्ती आणि देशवासीयांची एकता म्हणजे 'ऑपरेशन सिंदूर - आ . लोणीकर

# देशभक्तीपर घोषणा व फटाक्याच्या आतिषबाजीने मंठा शहर दनानले

तभा वृत्तसेवा
प्रतिनिधी/ मंठा

भारतानं दहशतवादाविरुद्ध कणखर भूमिका घेत पहलगाममधील हल्ल्याला चोख प्रत्युत्तर म्हणून आज पहाटे 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हल्ले करून ते नष्ट केल्याबद्दल मी भारतीय वायुसेना, नौसेना, थलसेनेच्या नेतृत्वाचं आणि 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी झालेल्या सैनिकांचं मनापासून अभिनंदन करतो. भारतीय सैनिकांच्या क्षमतेवर देशाला पूर्ण विश्वास असून संपूर्ण देश एकजुटीनं त्यांच्यामागे उभा असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. भारतीय वायुसेना, नौसेना, थलसेनेच्या नेतृत्वाचं आणि 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहभागी झालेल्या सैनिकांचं अभिनंदन करण्याकरिता आयोजित जल्लोष सोहळ्यात उपस्थित मंठा शहरातील नागरिकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी भारतीय सैन्याच्या समानार्थ उपस्थित आणि दिलेल्या देशभक्तीपर घोषणांनी व फटाक्याच्या आतिषबाजीने मंठा शहर दणाणून निघाले. यावेळी पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आता सहन केला जाणार नाही, हे 'ऑपरेशन सिंदूर'नं पुन्हा सिद्ध केलं आहे. पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा बळी गेला होता. या हल्ल्यानं संपूर्ण देश संतप्त होता. या हल्ल्याची जबाबदारी लश्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनांनी घेतली होती. याला प्रत्युत्तर म्हणून भारतानं आज भल्या पहाटे 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून नियोजनबद्ध, अचूक हल्ले करत दहशतवाद्यांचं कंबरडं मोडलं. या कारवाईत नऊ दहशतवादी तळ नष्ट करण्यात आल्याची माहिती आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद संपूर्ण संपेपर्यंत अशाच पद्धतीनं कारवाई होत राहील, हा संदेश देण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केली की देशाच्या सीमेपलिकडे जाऊन लष्करी कारवाई करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती महत्वाची असते. प्रधानमंत्री मा.श्री. नरेंद्र मोदी साहेबांच्या साहसी, कणखर नेतृत्वानं ती नेहमीच इच्छाशक्ती दाखवली आहे. भारतीय सैन्यदलांना संपूर्ण स्वातंत्र्य, मोकळीक, ताकद देत त्यांच्यामागे भक्कमपणे उभं राहिल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी साहेब, गृहमंत्री मा.श्री. अमित शहा जी, संरक्षणमंत्री मा.श्री. राजनाथसिंह जी यांचे देखील मी मनापासून अभिनंदन करतो. या प्रसंगी अजितदादा पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे परतुर मंठा विधानसभा अध्यक्ष भाऊसाहेब गोरे, मा.सभापती संदीपभैया गोरे, नगराध्यक्ष वैजनाथराव बोराडे, भाजपा मंठा तालुका अध्यक्ष नितीन राठोड, कैलास बोराडे, भाजपा प्रदेश सदस्य सतीशराव




निर्वळ, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष सरपंच आनंद जाधव , उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, मा.उपनगराध्यक्ष जे के कुरेशी, विकास सूर्यवंशी, मनोज देशमुख, नगरसेवक दवणे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष अमोल मोरे राजेभाऊ खराबे माऊली घोंडगे कैलास चव्हाण अमोल मोरे दिगंबर आवचार कैलास खराबे शरद मोरे प्रसादराव गडदे नरेंद्र ताठे भगवान लहाने , अभिजीत कोदंडे, नारायण कणसे जनार्दन घोडके बाळासाहेब घोडके सोनाजी जाधव दिलीप राठोड व इतर मान्यवर उपस्थित होते.

# मौजे चांगतपुरी येथील बोगस कामांची चौकशी करावी ग्रामस्थांचा टाहो

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील मौजे चांगतपुरी येथील अनेक विकास कामे बोगस झाले या बोगस झालेल्या विकास कामांची चौकशी करावी या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांचे तक्रार स्वरूपाचे निवेदन मौजे चांगतपुरी येथील ग्रामस्थांनी परतूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे . सविस्तर वृत्त असे की , मौजे चांगतपुरी ग्रामपंचायतीत सण २०२२ ते २०२५ या कालावधीत विवीध विकास कामांसाठी निधी मिळालेला होता. मात्र मौजे चांगतपुरी येथील सरपंच निळखंठ तौर यांनी निधीचा वापर करून मौजे चांगतपुरी ग्रामपंचायत क्षेत्रात कार्यरत असलेले विविध विकासकामे न करता स्वहिता साठी निधी उचलुन विविध विकास कामे न करता गावातील विकास कामे बोगस करून कोणतेही कामे न करता त्या कामांचे बिले , निधि उचलण्यात आलेला आहे. तरी संबंधीत ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांची चौकशी करूण कायदेशीर करवाई करण्यात यावी यासाठी समस्य मौजे चांगतपुरी येथील ग्रामस्थांनी





एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे . चांगतपुरी ग्रामपंचायत अंतर्गत स्मशानभुमीनचे अर्धवट काम केले चांगतपुरी ग्रामपंचायत अंतर्गत घरकूल न बांधता लाभार्थ्यांना चेक दिले गेले जी.प.प्रा. शाळा मौजे चांगतपूरी येथे कोणतेही रंगकाम ने करता बोगस बील उचलण्यात आहे . गावात विजेचे पोल असतात त्यावर डपू न बसवता परस्पर बीन उचलण्यात आले. सरपंच व ग्रामसेवक यांच्या संगणमताने कोणतीही पूर्वसूचना न देता ग्रामसभा घेतात.शाळेच्या पडीत ईमारतीमध्ये काही ग्रामस्थ जणावरांची विष्ठा टाकतात व शेतीविषयक औजारे ठेवत आहेत . तर निवेदन देताना विकास तातेराव तौर ,चंडीतराव तौर ,नितीन राधाकिसन तौर , अशोक उध्धवराव तौर ,बाबासाहेब माधवराव तौर ,माधव रामप्रमाद तौर ,दत्ता माणीकराव तौर ,सुनिक नारायणराव तौर आदी ग्रामस्थ उपस्थित होते .

### जालना–नांदेड समृद्धी महामार्गात संपादित होणाऱ्या शेतजमिनी शेतकऱ्यांच्या;बाजारभावा प्रमाणे मोबदला निश्चित करून त्याच्या पाच पट मोबदला द्यावा - खा . कल्याण काळे

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जालना-नांदेड समृद्धी महामार्ग हा जालना तालुक्यातील जवळपास १५ ते २० गावातील शेताजमिनिमधून संपादित केला जात आहे,परंतु सदरील शेतकऱ्यांच्या शेतजमीनी संपादित केल्या जात असतानी सदर कामामध्ये शेतकर्यांच्या प्रश्नांनकडे, मागण्याकडे प्रशासन गांभीर्याने लक्ष देत नाही. आजपर्यंत सदरील संपादनाच्या विरोधात शेतकऱ्यांनी विविध मार्गांनी आंदोलने, उपोषणे केली व त्यावरती प्रशासनाने वेळकाढू पणा करून तात्पुरती आश्वासने शेतकऱ्यांना देण्यात आली परंतु प्रशासनाकडून अद्यापही त्या बाबत ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे शेतक-यांना परत एकदा उपोषणाला बसण्याची वेळ प्रशासनाने आणलेली आहे. मागील चार दिवसांपासून जवळपास १०० ते १५० शेतकरी देवमूर्ती ता.जालना या ठिकाणी प्रशासनाच्या विरोधात उपोषण करत आहेत,




तरी शेतकऱ्यांच्या खालील मागण्यांसंदर्भात गांभीर्याने विचार करून शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम प्रशासनामार्फत तातडीने करण्याची वेळ आलेली आहे.जालना-नांदेड समृद्धी महामार्गात संपादित होणाऱ्या जालना शहारालगतच्या देवमूर्ती,पानशेंद्रा,गवळी पोखरी,सिंधीकाळेगाव,रामनगर व इतर सर्व गावातील शेतजमिनींना बाजारभावा प्रमाणे मोबदला निश्चित करून त्याच्या पाच पट मोबदला देण्यात यावा.जालना-नांदेड समृद्धी महामार्गा मध्ये संयुक्त मोजणीमध्ये आलेल्या सर्व घटकांचा मोबदला निश्चित करण्यात यावा व पुन्हा मुल्यांकन करून नवीन अवार्ड तयार करण्यात यावे.जालना-नांदेड समृद्धी महामार्गात शेतकऱ्यांच्या संपादित होणाऱ्या शेतजमिनींचे मुल्यांकन करत असतानी त्यामध्ये असलेले घर,विहीर,गोठा,बोरवेल यांचे मुल्यांकन करण्यात यावे तसेच पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या शेतजमिनींचे बागायती म्हणून मुल्यांकन करण्यात यावे. ज्या शेतकऱ्यांच्या संयुक्त मोजणी करते वेळेस झालेल्या चुकांमुळे आक्षेप अर्ज आले असतील त्यांच्या सुनावण्या घेऊन त्यामध्ये दुरुस्ती करण्यात यावी व तसे दुरुस्त अवार्ड करण्यात यावेत.जालना तालुक्यातील देवमूर्ती येथे शेतकऱ्यांचे चालू असलेल्या आंदोलन स्थळी प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्याचे प्रामाणिक प्रयत्न करून शेतकर्यांनी आंदोलन पुढे चालू ठेऊ नये या साठी ठोस प्रयत्न करण्यात यावेत.तसेच जोपर्यंत सदर महामार्गासाठी ८०% शेतकरी सहमती देत नाहीत तोपर्यंत सदरील महामार्गाचे कोणत्याही प्रकारचे काम शेतकऱ्यांवर बळजबरी करून चालू करण्यात येऊ नये.

आपली सकारात्मक व तात्काळ कृती अपेक्षी आहे.

# गॅस एजन्सी चालकाकडून ग्राहकांची लुट ; पुरवठा अधिकाऱ्याची दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**मंठा /प्रतिनिधी**

सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे घरगुती वापराचा गॅस सिलिंडर. मात्र शासनाने आणि संबंधित गॅससिलिंडर पुरवठा करणाऱ्या कंमन्यांनी निर्धारित केलेल्या किमतीपेक्षा गॅस सिलिंडर वितरक ३० ते ४० रुपये जास्त घेत आहेत. आर्थिक लुबाडणूक होत असल्याने ग्राहक कमालीचे त्रासले आहेत. याबाबत दाद मागायची तरी कोणाकडे, असा प्रश्न ग्राहकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. शहरालगत इंण्डेन ची हरीओम गॅस एजन्सी कार्यरत असुन बाजार समिती परिसरात या एजन्सीचे कार्यालय आहे. त्यामुळे गॅस सिलिंडर घरपोच करणाजया कर्मचाजयांना दिवसाला मोजकेच सिलिंडर वितरित करण्यासाठी मिळत आहेत. त्यामुळे सिलिंडर वितरित करणारी व्यक्ती कोणाकडून ३० रुपये, तर कोणाकडून ४० रुपये आगाऊ घेत आहेत. ग्राहक तशी त्यांची रक्कम ठरवीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांची लूट सुरू आहे. तक्रार करायची तरी कोणाकडे, असा प्रश्न ग्राहकांना पडला आहे.संबंधित एजन्सीकडे तक्रार केली, तर उलट ग्राहकांनाच डोळ्यावर धरत त्याला सिलिंडर मिळण्यास कसा त्रास होईल, असा प्रयत्न केला जातो. त्यामुळे काही ग्राहक गॅस सिलिंडरसाठी जास्तीची रक्कम मोजत आहेत.संबंधित गॅस वितरकांकडून ग्राहकांना सिलिंडर घरपोच देण्यासाठी सर्रास घेतले जात आहेत. एखाद्या ग्राहकाने आगाऊ रक्कम देण्यास मनाई केली, तर त्याला सिलिंडर दिला जात नाही. त्यामुळे ग्राहक संताप व्यक्त करीत आहेत. पावतीपेक्षा मूँहमांगी किमत मागून ग्राहकांना लुटण्याचा गोरखधंदा सध्या गॅस एजन्सी मालक व वितरकांनी सुरू केल्याने ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.काही वेळा आगाऊ रक्कम ही डिलेव्हरी चार्जेस असल्याचेही सांगितले जात आहे. सामान्य ग्राहकांकडून करण्यात येत आहे.काय आहे नियम ?सिलिंडर ग्राहकाला घरपोच देणे किंवा ग्राहकाने संबंधित वितरकाच्या गोदामातून घेऊन जाण्याचा पर्याय आहे. ग्राहक स्वत: गोदामातून सिलिंडर घेणार असल्यास त्याने त्याबाबत अर्ज देणे आवश्यक आहे. ग्राहकांकडून घरपोच सिलेंडरचे पैसे घ्यायचे मात्र कधीही रस्त्यावर असा मंठा शहरा लगतच्या हरी ओम गॅस एजन्सींचा टाक्या बनला आहे. त्यामुळे ग्राहकांना ज्यादा पैसे मोजणी सिलेंडर उचलून घरी न्यावा लागत आहे. याकडे तालुका पुरवठा विभागाचे अधिकारी मन:पूर्वक दुर्लक्ष करत आहेत अशी मागणी नागरिकतुन होत आहे.




## टी.आय.एम.ई. कॅट २०२५२६ टॅलेंट सर्च एक्झामिनेशन जाहीर

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)– टी.आय.एम.ई. संस्थेने कॅट २०२५२६ च्या इच्छुक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती चाचणी सुरू केली आहे – टी.आय.एम.ई.. टॅलेंट सर्च एक्झामिनेशन जाहीर करण्यात आले आहे. ही परीक्षा दोन टप्प्यात घेतली जाईल: १० मे २०२५ रोजी संध्याकाळी ६:०० वाजता आणि ११ मे २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता. विद्यार्थ्यांना फक्त एकाच पसंतीच्या जागेसाठी नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे. टी.आय.एम.ई. टॅलेंट सर्च परीक्षेत परिमाणात्मक, तार्किक आणि मौखिक क्षमतेवर बहुपर्यायी प्रश्न असतील. हे टी.आय.एम.ई. टॅलेंट सर्च परीक्षेचा कालावधी १ तास असेल. ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतली जाईल. ४ ते ११ मे २०२५ दरम्यान नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना ५००० रुपयांची सूट मिळेल. कॅट२६ अभ्यासक्रम शुल्क (अटी आणि नियम लागू).

जर तुम्ही टी.आय.एम.ई. असाल तर. जर तुम्ही ४ मे २०२५ पूर्वीचे विद्यार्थी असाल आणि नोंदणी केली असेल, तर तुम्ही कॅट टीटीएसईसूटसाठी पात्र राहणार नाही.

## शाश्वतता आणि डिजिटलायझेशनला केले अधिक प्रबळ

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)– नेस्ले इंडियाने अलीकडेच महाराष्ट्रातील भिवंडी येथे आपले अद्ययावत वितरण केंद्र (डिस्ट्रिब्युशन सेंटर – डीसी) सुरू केले. तंत्रज्ञान हे प्रगतीला चालना देणारे प्रेरक बल आहे हा नेस्ले इंडियाचा दृढविश्वास या डिस्ट्रिब्युशन सेंटरच्या रूपाने साकार झाला आहे. वेअरहाऊसच्या कामकाजासाठी एक डिजिटल ट्विन किंवा डिजिटल प्रतिरूप म्हणावे असे प्लॅनिंग टूल वापरणारे नेस्ले इंडियाचे हे पहिलेच डीसी आहे, जे वेअरहाऊसच्या अधिक चांगल्या नियोजनास व सुसज्जतेस मदत करणारे आहे. या डिस्ट्रिब्युशन सेंटरमध्ये असलेल्या सुमारे २०,००० पॅलेट पोझीशन्स आणि चॉकलेट साठविण्यासाठीचे सर्वात मोठे शीतगृह यांच्या साथीने कंपनी या उद्योगक्षेत्रातील मालाच्या पुरवठ्यासाठीच्या निकषांचा दर्जा उंचावत आहे. सात महिन्यांच्या विक्रमी काळात पूर्ण झालेले हे डिस्ट्रिब्युशन केंद्र अद्ययावत तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे, ज्यात स्वतंत्र रिपॅकिंग सेंटर आणि भाताची पहिली शटल रॅकिंग सिस्टिम ही वेअरहाऊसमधील जागेचा अधिक काटेकोरपणे वापर करण्यास मदत करणारी सघन रॅकिंग यंत्रणा यांचा समावेश आहे.

## दुबईत मराठी भाषिकांचा आवाज अजून बुलंद – रविंद्र चव्हाण

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)– व्यवसाय आणि नोकरीनिमित्त दुबईत राहणाऱ्या दीड लाख मराठी भाषिकांकरिता नुकतीच महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली गेली. संयुक्त अरब अमिरातीत राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी स्थापन केलेल्या इंडियन पीपल्स फोरम या व्यापक संस्थेची अंगीकृत संस्था म्हणून ही परिषद कार्यरत राहणार आहे. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दुबईत महाराष्ट्र कौन्सिलची मुहूर्तमेढ रविवार, दि ४ मे रोजी रोवली गेली. स्थापना सोहळ्याप्रसंगी बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की महाराष्ट्र काउन्सिलच्या महा हेल्पलाइन आणि युनायटेड महाराष्ट्र प्लॅटफॉर्म या अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमांमुळे दुबईस्थित मराठी माणसांचा आवाज अधिक बुलंद होईल आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिक बळ मिळेल.

## एसबीआय लाइफकडून हॅक–एआय–थॉन लाँच

पुणे दि.७ (प्रतिनिधी)– एसबीआय लाइफ इन्शुरन्स या भारतातील सर्वात विश्वसनीय खाजगी आयुर्विमा कंपनीने हॅक–एआय–थॉनचे पहिले एडिशन लाँच केले. हा देशव्यापी इनोव्हेशन उपक्रम हुशार टॅलेंटना एआयचा फायदा घेत जीवन विम्याचे भविष्य बदलण्यास आवाहन करतो. हा उपक्रम भारतभरातील टेक विद्यार्थ्यांना विम्यामधील व्यवसायासाठी महत्त्वपूर्ण आव्हानांकरिता सहयोगाने सोल्यूशन्स डिझाइन करण्यासाठी अद्वितीय प्लॅटफॉर्म देतो, तसेच ग्राहक अनुभव, उत्पादन उपलब्धता आणि फसवूणकीला प्रतिबंध यामध्ये परिवर्तन घडवून आणण्यावर याचा मुख्य फोकस आहे.

## निखिल आर्य 'तेनाली रामा' मालिकेत दिसणार

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)– सोनी सबवरील 'तेनाली रामा' ही मालिका त्यातील चातुर्याच्या, सुजाणतेच्या गोष्टींमुळे आणि अनपेक्षित कलाटण्यांमुळे प्रेक्षकांना आवडत आहे. कहाणी पुढे सरकत आहे आणि अधिक खोलात देखील जात आहे अशा वेळी हमखास एखाद्या नव्या पात्राची कथेत एंट्री होते. नव्याने दाखल होत असलेली व्यक्तिरेखा काहीशी अबोल आहे, आसपास काय चालले आहे, याचे निरीक्षण करणारी आहे आणि आपला आवाज न चढवता सगळ्यांचे लक्ष वेधून घेणारी आहे.

## खऱ्या मातांकडून त्यांना कशी प्रेरणा मिळते

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)– या मदर्स डे च्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार एकमुखाने आपल्या जीवनातील दोन मातृ मूर्तींना आदरांजली वाहत आहेत– त्यांची जन्मदात्री माता आणि पडद्यावरची माता, जी दीर्घ काळ एकत्र काम केल्यानंतर कुटुंबाचा भाग होऊन जाते! देशना दुगड, दर्शन गुर्जर, चिन्मयी साळवी आणि कृष्ण भारद्वाज हे कलाकार सांगत आहेत या दोन्ही अद्भुत महिलांकडून त्यांना मिळणाऱ्या प्रेमाबद्दल, समर्थनाबद्दल आणि प्रेरणेबद्दल. पडद्यामागच्या आठवणींपासून ते सेटवर जोपासल्या गेलेल्या नात्यापर्यंत या दोन्ही मातांनी त्यांच्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनाला आकार दिला आहे,

## निखिल आर्य 'तेनाली रामा' मालिकेत दिसणार

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)– सोनी सबवरील 'तेनाली रामा' ही मालिका त्यातील चातुर्याच्या, सुजाणतेच्या गोष्टींमुळे आणि अनपेक्षित कलाटण्यांमुळे प्रेक्षकांना आवडत आहे. कहाणी पुढे सरकत आहे आणि अधिक खोलात देखील जात आहे अशा वेळी हमखास एखाद्या नव्या पात्राची कथेत एंट्री होते. नव्याने दाखल होत असलेली व्यक्तिरेखा काहीशी अबोल आहे, आसपास काय चालले आहे, याचे निरीक्षण करणारी आहे.

# वाहक चालक गेले अधिवेशनाला प्रवाशांचे झाले हाल खाजगी वाहतुकीची चांदी !

कन्नड दि.७ (प्रतिनिधी)– कन्नड आगारातील ५० एसटी वाहक चालक व कर्मचारी कामगार संघटनेच्या राज्यव्यापी अधिवेशनाला गेल्याने एसटी बस अभावी प्रवाशांचे हाल झाले. कन्नड आगारात ८९ चालक, ६० वाहक कार्यरत आहेत.






यांपैकी २२ चालक, २६ वाहक, एक कंट्रोलर, एक मेकॅनिक असे ५० एसटी कर्मचारी रायगड येथे आयोजित राज्य परिवहन महामंडळाच्या कामगार संघटनेच्या राज्यव्यापी अधिवेशनासाठी गेलेले आहेत. यामुळे सोमवारी (दि.५) व मंगळवारी प्रवाशाचे एस.टी. अभावी हाल झाले. लग्नसराई असल्याने सोमवारी व मंगळवारी बस स्थानकात मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली. कन्नड बस स्थानकातून दररोज एसटी बसचे ४५ नियतने होतात यापैकी ३० नियतने सुरू आहेत तर १५ नियतने रद्द करावी लागली यामुळे आगाराचे सुमारे रोज दीड ते दोन लाखाचे नुकसान होत असल्याची माहिती स्थानक प्रमुख पगारे यांनी दिली.

# प्रदूषणापासून प्रतिबंधापर्यंत: जागतिक दमा दिन २०२५ निमित्त महाराष्ट्राचा दम्याविरुद्धचा लढा

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)– छत्रपती संभाजीनगर चा १३ वर्षांचा रोहन, त्याला अनेकदा शाळा चुकायची, रात्रभर खोकला यायचा आणि थकव्याने तो झगडत असे. जेव्हा तिच्या पालकांनी शेवटी मेडिकव्हरकडून मदत मागितली तेव्हा निदान स्पष्ट झाले . दमा, महाराष्ट्राच्या वाढत्या शहरी भूदृश्यांमध्ये सामान्य असलेल्या पर्यावरणीय घटकांमुळे वाढला.

पल्मोनोलॉजिस्ट, डॉ. आशिष गाडे, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगर सांगतात ,महाराष्ट्रात ३० लाखांहून अधिक दम्याचे रुग्ण आहेत, ज्यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक सारख्या शहरांमध्ये प्रौढ आणि व्यायामामुळे होणाऱ्या



दम्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. खराब हवेची गुणवत्ता, वाहनांची गर्दी आणि बदलते हवामान हे मुख्य कारण आहेत, विशेषतः हिवाळ्याच्या महिन्यांत.

मेडिकोव्हरच्या पल्मोनोलॉजी टीम्स ३६०–अंश दमा काळजी मॉडेल – स्पायरोमेट्री चाचणी, इनहेलर मार्गदर्शन, प्रदूषण एक्सपोजर समुपदेशन आणि तंत्रज्ञान–सक्षम औषधांचे पालन या ट्रेंडशी लढण्यात आघाडीवर आहेत. उपनगरीय आणि ग्रामीण भागात आमच्या दम्याच्या संपर्क शिबिरांमुळे लवकर निदान होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या सुधारले आहे.

तथापि, इनहेलरबद्दल काळजीची सातत्यता नसणे हे मुख्य अडथळे आहेत, विशेषतः वंचित समुदायांमध्ये. म्हणूनच आमचे लक्ष दीर्घकालीन रुग्ण शिक्षणावर आहे, ज्यामध्ये कुटुंबे, शाळा आणि स्थानिक आरोग्य कर्मचारी यांचा समावेश आहे. या जागतिक दमा दिनी, आम्ही "दमा शिक्षण सक्षमीकरण" या थीमवर काम करत आहोत. महाराष्ट्रात, आमचे ध्येय स्पष्ट आहे – उपचारांपासून प्रतिबंधाकडे जाणे आणि प्रत्येक श्वास सुरक्षित आहे याची खात्री करणे.

# फर्दापूर परिसरात दुपारी तीन वाजता वादळी वाऱ्यासह पाऊस



फर्दापूर दि.७ (प्रतिनिधी)– दुपारी तीन वाजता फर्दापूर परिसरात जोरदार वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला असल्याने यामुळे शेतकरी यांची फार धांदल उडाली काही शेतकऱ्यांची मका काढणे तसेच गुरांचा चारा भरण्याची या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले काही शेतकरी मका काढणीस सुरू असताना जोरदार वादळी वाऱ्यास पाऊस आला यामुळे शेतकऱ्यांचे मोठे धांदल उडाली तसेच काही शेतकऱ्यांचे चारा झाकण्यासाठी फार दमचाक झाली.

# एमजीएमच्या शेख सैफ याचा राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत प्रथम क्रमांक

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)– महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाचा विद्यार्थी शेख सैफ याने महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेत देशभरातील विविध कायद्याच्या विद्यापीठांमधून ६० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला होता.

'डिस्कसिंग यूसीसी विथ स्पेशल एम्फेसिस ऑन सिविल यूनियन्स एंड लिव–इन ऐम्बिट' या विषयावर शेख सैफ याने आपले विचार मांडले. या स्पर्धेमध्ये एमजीएम विद्यापीठाच्या वतीने स्कूल ऑफ लिगल स्टडीज अँड रिसर्च आणि कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाच्या विद्यार्थ्यांनी आपला



सहभाग नोंदवला होता. शेख सैफ याने याआधीही अनेक वकृत्व स्पर्धा, युवा संसद आणि मॉडेल युनायटेड नेशन्स परिषदांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

एमजीएम विद्यापीठाकडून विविध राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी आम्हां विद्यार्थ्यांना कायमच मिळत आली आहे. अशा राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतल्यामुळे अनेक गोष्टी शिकायला मिळत आहेत. या स्पर्धेत विविध राज्यांतून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून एक वेगळा दृष्टिकोण आम्हां सर्व विद्यार्थ्यांना मिळाला असल्याची भावना एमजीएमच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम,कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ,कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व प्राचार्या डॉ.रेखा शेळके यांनी शेख सैफ याचे या राष्ट्रीय स्पर्धेतील यशाबद्दल अभिनंदन करत त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



## सोयगाव शहरात भाजप कार्यकर्त्यांचा जल्लोष

सोयगाव दि.७ (प्रतिनिधी)– शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जातीय जनगणना करण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय मंत्रिमंडळा मध्ये मंजुरी देण्यात आली.या निर्णयामुळे भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला.यावेळी भारतीय जनता पक्षाचे सोयगाव तालुकाध्यक्ष संजय पाटील,माजी तालुकाध्यक्ष बद्री राठोड, शहराध्यक्ष माजी उपाध्यक्ष तथा योगेश पाटील,सुनील गवांडे,मयूर मनगटे,संजीवन सोनवणे,अनीस तडवी,अमृत राठोड,भिवा चव्हाण,दिलीप पाटील,वंदना पाटील,जरंडी सरपंच स्वाती पाटील,नंदाबाई आगे,भाऊराव साळवे,अनिल पाटील,संतोष पाटील,जगन पाटील,दीपक पाटील,संजय चौधरी,संजय आगे,संजय मंडवे,सूरज राजपूत,अनिल जाधव,आदींसह तालुक्यातील भाजपा कार्यकर्त्यांत मोठया संख्येने उपस्थित होते.

IIFL FINANCE
CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक १२.०५.२०२५** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **औरंगाबाद–पैठण गेट रोड–जोशी हाइट्स, कमर्शियल ग्राउंड फ्लोअर, उजव्या बाजूचा भाग, सीटीएस क्रमांक १४१८५ क्रांति चौक ते गुलमंडी रोड येथे स्थित, पैठण गेट परिसर, औरंगाबाद–४३१००१,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL24644419, GL30309507, GL31723856, GL34064123, GL34325426, GL32417462, GL32441583, GL32794286, GL32801349, GL33223202, GL33238556, GL32240615, GL33151953, GL30938744, GL30949910, GL32543962, GL32714990, GL32788086, GL32799723, GL32855006, GL32971584, GL32983905, GL33141322, GL34110803, GL34101257, GL34174227, GL34192130, GL34237302, GL32264657, GL32806472, GL32790130, GL33007821, GL33020709, GL33429316, GL33402096, GL34084881, GL34057516, GL25839738, GL34156405, GL32446421, GL32470917, GL32745105, GL32736878, GL33396552, GL33377842, GL33786213, GL34131558, GL34077787, GL34113434, GL34092233, GL34127000, GL34142488, GL34152107, GL34152327, GL34297108, GL34318408, GL34340124, GL32052945, GL32130997, GL32333703, GL32339641, GL32892086, GL32871210, GL33186224, GL33935740, GL34070769, GL34258253.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : ०८.०५.२०२५
स्थळ: छत्रपती संभाजी नगर

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

# छत्रपती संभाजीनगर शहर आणि परिसरात सलग तिसऱ्या दिवशी अवकाळी पाऊस

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)– शहर व परिसरासह ग्रामीण भागात सलग तिसऱ्या दिवशीही अवकाळी पावसाने हजेरी लावली. आज, बुधवारी दुपारी शहरात अचानक वादळी वारे वाहू लागले. त्यानंतर जोरदार पावसाला सुरुवात झाली. भर दुपारी तब्बल वीस मिनिट ते अर्धा तास अवकाळी पावसाने गाठल्याने नागरिकांची धांदल उडाली. मात्र, पाऊस पडून गेल्यानंतर उन्हाची तीव्रता कमी होऊन वातावरणात थंडावा आला आहे.

वातावरणातील अनपेक्षित बदलांमुळे जिल्ह्यात ५ ते ८ मेदरम्यान अवकाळी पावसासह गारपिटीचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मंगळवार, दि. ६ मे रोजी सिल्लोड तालुक्यातील सिसारखेडा येथे सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास सुनील गोविंदा चिरखे (२५) यांच्यावर वीज पडून मृत्यू झाल्याची घटना घडली, अशी माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाने दिली. काही ठिकाणी गारपीट झाल्याची नोंद प्रशासनाने घेतली. ढगाळ वातावरणामुळे कमाल तापमान ३६.५ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २३.९ अंश सेल्सिअवर होते.

दि. ५ रोजी शहर परिसरासह वाळूजला



पाऊस व गारपीट झाली. वैजापूर तालुक्यातील शिऊर आणि गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशनही पावसासह गारपिटीने हजेरी लावली. जिल्ह्यातील एकासह मराठवाड्यात एकूण तीनजणांचा वीज पडून मृत्यू झाला, पशुधनाचेही मोठे नुकसान झाले. मंगळवारी दुपारनंतर ढगाळ वातावरण होते. दुपारी अडीच ते तीनच्या सुमारास शहरातील अनेक भागांमध्ये पावसाने हजेरी दिली.

सिल्लोड तालुक्यामध्ये चार वाजेपासून सुसाट वारा व ढगाळ वातावरण होते. सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान आमठाणा व भराडी मंडळात काही गावांत गारपिटीची नोंद झाली.

संपादकीय

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# दुटप्पी पाकिस्तानला 'जागतिक' बत्ती

दक्षिण आशियातील भूराजनीती (जिओ-पॉलिटिक्स) जगाच्या इतर भागांपेक्षा वेगळी आहे. ती गुंतागुंतीची तर आहेच, शिवाय दहशतवादाचा प्रादुर्भाव या भागात अधिक आहे. एकीकडे जागतिक स्तरावर अनेक राष्ट्रे, दहशतवाद कोणत्याही स्वरूपातला असो, त्याला विरोध करायचा आणि त्याचा नाश करायचा, या मताप्रत आलेली आहेत. भारताचा शेजारी पाकिस्तान मात्र अजून मध्ययुगात आहे. त्याला अजूनही असे वाटते की, दहशतवाद्यांना पोसून, चिथावून आणि हल्ले घडवून आपले काही भले होईल किंवा आपला धाक निर्माण होईल. तशातले काहीही घडत नाही, हे पाकिस्तानचे दुखणे. पहलगामनंतर भारताच्या भूमिकेने त्याचे दुखणे वाढले. तेच त्याने संयुक्त राष्ट्रांसमोर मांडले तर तेथेही त्याला बत्ती दिली गेली. भारताकडून आपली कोंडी केली जात असून, त्यामुळे प्रादेशिक स्थिरता व शांतता धोक्यात येईल, असा पाकिस्तानचा कांगावा होता. पहलगामच्या हल्ल्यामागे पाकिस्तान, त्यापूर्वी भारतात झालेल्या अनेक हल्ल्यांमध्ये त्याच देशाचा हात आणि तरीही आमचे सार्वभौमत्व टिकवण्यासाठी आम्ही लढत राहण्याच्या बाता हा केवढा मोठा शहाजोगपणा! पण, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत १५ पैकी १३ सदस्यांनी भारताला पाठिंबा दिला आणि त्यामुळे पाकिस्तानची पुन्हा एकदा जगात नाचक्की झाली. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद हा भारतीय उपखंडाच्या शांतता आणि सुरक्षिततेला धोका असल्याचे पाकिस्तान वगळता साऱ्या दुनियेला मान्य आहे. पहलगामचे धागेदोरे पाकिस्तानपर्यंत आहेत, हेही सर्वांना माहिती आहे. त्यामुळेच नद्यांचे पाणी रोखणे, आयातबंदी, रस्तेबंदी अशी अनेक पावले भारताने पाकिस्तानच्या विरोधात उचलली. या पृष्ठभूमीवर संयुक्त राष्ट्रांमध्ये जे घडले ते ऐतिहासिक होते. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या पंधरापैकी तेरा सदस्यांनी भारतासोबत एकजुटीने उभे राहून पाकिस्तानचे ढोंग थेट उघडेच पाडले. अशा लाजिरवाण्या परिस्थितीतही सुधारणा करण्यास किंवा माघार घेण्यास पाकिस्तान तयार दिसत नाही. सार्वभौमत्वाची पुंगी वाजविणे सुरूच आहे.

थोडे मागे वळून पाहिले तर असे दिसते की, तीन ते दशकांपासून भारत सातत्याने पाकिस्तानच्या कुरघोड्यांमुळे कुठल्या ना कुठल्या संघर्षात ओढला जातोय. १९९० मध्ये काश्मिरी पंडितांच्या पलायनापासून ते २००८ मध्ये मुंबईतील हल्ला आणि पुलवामा ते पहलगामपर्यंतच्या भयंकर हल्ल्यांपर्यंत, दहशतवादाला पाठिंबा देण्यात पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावेच भारताकडे आहेत. अमेरिकेच्या माजी परराष्ट्र मंत्री हिलरी क्लिंटन एकदा म्हणाल्या होत्या, "आपण घरात साप पाळत असू तर ते केवळ शेजाऱ्यांना चावतील अशी अपेक्षा करू शकत नाही... ते तुम्हालाही चावू शकतात..." दहशतवादी सापांनी भारताचे चावे घेतलेच, पण पाकिस्तानलाही सोडलेले नाही. दहशतवादाचा अभ्यास करणाऱ्या एका संस्थेने जारी केलेल्या अहवालानुसार, पाकिस्तानमध्ये लष्कर-ए-तैयबा (एलईटी), जैश-ए-मोहम्मद (जेईएम) आणि हिजबुल मुजाहिदीनसह ८० हून अधिक ज्ञात दहशतवादी संघटना आहेत. त्यातील बऱ्याच संघटनांना तिथल्या सरकारचे थेट वा अप्रत्यक्ष समर्थन आहे. त्यामुळेच दहशतवादी माजले आहेत. पहलगाममध्ये त्यांनी जे निर्घृण हत्याकांड घडविले, ते पशूंनाही लाजवेल एवढे भयंकर होते. त्यामागे जनरल मुनीरचे डोके होते, असे जाहीरच म्हटले जातेय. आयएसआयकडेही बोट दाखविले जातेय. अशा स्थितीत आत्मपरीक्षण करण्याऐवजी, सुधारणा करण्याऐवजी पाकिस्तानने संयुक्त राष्ट्रांकडे हस्तक्षेपाची मागणी केली. पण, शेवटी पाकिस्तानच तोंडघशी पडला. १५ पैकी १३ संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्य केवळ भारताच्या पाठीशी उभे राहिले नाही, तर सीमापार दहशतवादाला सतत पाठिंबा दिल्याबद्दल पाकिस्तानला फटकारलेही गेले. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी पहलगाम हल्ल्याचा स्पष्ट शब्दांत निषेध केला आणि दोन्ही राष्ट्रांना संयमाची गरज असल्याची आठवण करून दिली. त्यांचाही संदेश स्पष्ट होता की, पाकिस्तानने ओरडण्यापूर्वी स्वतःचे घर व्यवस्थित करावे. अशातही बेशरमपणाची हद्द म्हणजे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत पाकिस्तानची भूमिका आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाभोवती केंद्रित होती. ओसामा बिन लादेनला आश्रय देणार पाकिस्तान, दाऊद इब्राहिमला सांभाळणार पाकिस्तान, हाफिज सईदची काळजी घेणार पाकिस्तान, भारतात हल्ले घडवणाऱ्यांना मदत करणार पाकिस्तान, प्रोत्साहन देणार पाकिस्तान... आणि तरीही सार्वभौमत्वावर उच्चारवाने नारे देणार पाकिस्तान! भारताने स्वतःहून कधीही पाकिस्तानमध्ये हस्तक्षेप केला नाही. मात्र, आपल्या देशावर हल्ले झाले तर सर्जिकल स्ट्राईक करताना मागेपुढेही पाहिले नाही. भारताने आक्रमक म्हणून नव्हे तर आपल्या लोकांचे, आपल्या सीमांचे आणि आपल्या भविष्याचे रक्षण करण्यासाठी कारवाया केल्या. पाकिस्तानला आपल्या सीमांचे रक्षण करण्याचा अधिकार असेल, तर भारताचा स्वसंरक्षणाचा अधिकार आणि त्यासाठी पाकिस्तानच्या विरोधात कारवाई करण्याचा अधिकार अमान्य कसा करता येईल? दहशतवादाचा वापर स्टेट पॉलिसी अर्थात देशाचे धोरण म्हणून जो देश करीत असेल, त्याच्याबद्दल आंतरराष्ट्रीय समुदायात सहानुभूती असण्याचे कारण नाही. त्यामुळेच भारताला जगातून मिळणारा पाठिंबा सतत वाढतोय आणि पाकिस्तानची वाटचाल वेगाने बहिष्कृत राष्ट्र म्हणून कुख्यात होण्याच्या दिशेने सुरू आहे. पाकिस्तानची कोंडी करण्यासाठी भारताने सिंधू करार स्थगित केला. धरण बांधणी आणि पाणी वळवण्याचे प्रकल्प जलद गतीने सुरू केले. त्यामुळे पाकिस्तानला अब्जावधी घनमीटर पाण्यापासून वंचित राहावे लागेल. भारताने सीमा बंद केल्या, व्यापार बंद केला. ही पावले म्हणजे युद्ध नव्हे. ती धोरणात्मक पावले आहेत आणि नैतिकतेच्या व आंतरराष्ट्रीय शांततेच्या नावाखाली पाकिस्तानचा आगाऊपणा खपवून घेतला जाणार नाही, याचा तो इशाराही आहे. भारत-पाक संबंधातील तणावाच्या केंद्रस्थानी एक ऐतिहासिक वास्तव आहे आणि ते असे की, आपल्यासोबत स्वतंत्र झालेला हा देश प्रगत जगाच्या बरोबरीने प्रगती करतोय आणि आपण निव्वळ रांगतोय, ही पाकिस्तानची भावना आहे. या भावनेला त्या देशात राजकीय, सांस्कृतिक, व्यावहारिक आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संस्थात्मक अधिष्ठान मिळालेले आहे. शालेय पाठ्यपुस्तकांपासून ते धर्मगुरूंच्या प्रवचनांपर्यंत भारत विरोध हेच पाकिस्तानचे जीवनध्येय आहे. पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआय भारताला शाश्वत शत्रू मानतात, तसे दाखवितात आणि मलिदा खातात. लोकांना खायला अन्न नाही, पण त्यांचे संरक्षणाचे बजेट फुगत असते. जोपर्यंत लोकनिर्वाचित सरकार शांततेत, शहाणपणाने व व्यावहारिक निर्णय घेण्याच्या स्थितीत येत नाही, तोवर हे असेच चालत राहणार आहे. आणि ते असेच चालत राहणार असेल तर भारताला आणि जागतिक समुदायालाही जशास तसे वागावे लागणार आहे. आता जागतिक समुदायाने हेही लक्षात घेतेल पाहिजे की, दहशतवादाला समर्थन हा पाकिस्तानच्या राष्ट्रीय धोरणाचा भाग आहे. बंद दरवाज्याच्या मागे दहशतवाद्यांशी बोलायचे, त्यांना पोसायचे आणि जागतिक समुदायासमोर दहशतवादविरोधी युद्धात पाकिस्तान जगाच्या बरोबर आहे, असे सांगायचे असा हा दुटप्पी देश. त्याचा भारतविरोध वारंवार उफाळून येतो आणि कधी पुलवामा तर कधी पहलगाम घडते. २०१९ मध्ये कलम ३७० रद्द केल्यापासून जम्मू आणि काश्मीरची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारू लागली. अशा स्थितीत पहलगामचा हल्ला झाला. त्यामागे पाकिस्तानचा हात आहेच. एकीकडे काश्मिरींच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही लढतोय असे म्हणायचे आणि त्याच काश्मिरी लोकांच्या कल्याणात अडथळे आणायचे हाही पाकिस्तानी दुटप्पीपणा. पाकिस्तानच्या भूमीवर शेवटचा दहशतवादी जिवंत असेपर्यंत त्याने सार्वभौमत्वाच्या बाता करू नयेत. जिथे लोकशाहीच नावापुरती आहे, तिथे सार्वभौमत्वाच्या चिंधड्या उडणारच. त्या पाकिस्तानात उडाल्या आणि उडतच आहेत. या स्थितीत आपल्या देशातील निष्पापांचे जीव घेतले जात असतील तर सार्वभौमत्वाच्या किंवा नैतिकतेच्या गप्पा विसरून शत्रूचा गळा आवळणे हाच राजधर्म आहे आणि त्याच धर्माचे पालन भारत करीत आहे.

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# उत्तम दरासाठी प्रक्रिया उद्योगावर हवा भर

जगभरात शेतांपासून दुकानांपर्यंत १३.२ टक्के अन्न वाया जाते. १७ टक्के अन्न दुकाने आणि घरांमधून फेकून दिले जाते. एकूणच, सुमारे ३० टक्के अन्न कधीच कोणाच्याही पोटात पोहोचत नाही. गरीब देशांमध्ये शेतातून गोदामे आणि दुकानांपर्यंत अन्न येताना वाया जाते. श्रीमंत देशांमधील बहुतेक अन्न घरांमध्ये वाया जाते, म्हणजेच लोक गरजेपेक्षा जास्त खरेदी करतात आणि उरलेले अन्न फेकून देतात. भारतात अन्न वाया जाण्याबाबत कोणतेही मोठे सरकारी सर्वेक्षण झालेले नाही; परंतु कापणीनंतर बनणारे किती अन्न वाया जाते हे शोधण्यासाठी काही सर्वेक्षणे करण्यात आली आहेत. 'आयसीएआर-सीआयपीएचईटी' ने २०१२ आणि २०१५ मध्ये सर्वेक्षण केले. 'नॅबकॉन्स' या संस्थेने २०२२ मध्ये सर्वेक्षण केले. त्याचे सर्वेक्षण अहवाल पाहिल्यास भारतात धान्य उत्पादनात खूप वाढ झाली आहे, हे लक्षात येते. १९६६-६७ मध्ये आपण ७४ दशलक्ष टन धान्याचे उत्पादन करायचो. ते २०२२-२३ मध्ये वाढून ३३० दशलक्ष टन झाले. आपण तांदळाचे मोठे निर्यातदारही आहोत. फळे आणि भाज्यांचे उत्पादनही वाढले आहे; पण उत्पादन वाढत असताना, तोटाही वाढत आहे. येथे यंत्रांचा वापर कमी आहे आणि गोदामातून दुकानांपर्यंत माल पोहोचवण्याची व्यवस्थाही कमकुवत आहे. या सर्वेक्षणातून दिसून आले आहे की, कापणीनंतरचे नुकसान थोडे कमी झाले आहे; परंतु तरीही अजून ते खूप जास्त आहे. 'नॅबकॉन्स'च्या २०२२ च्या सर्वेक्षणानुसार २०२० ते २०२२ दरम्यान पिकांचे आणि शेतीशी संबंधित गोष्टींचे नुकसान झाल्यामुळे आपल्याला दरवर्षी १.५३ लाख कोटी रुपयांचे (१८.५ अब्ज डॉलर्स) नुकसान सहन करावे लागले आहे. भारतात धान्य, डाळी आणि तेलबियांचे नुकसान जागतिक पातळीपेक्षा जास्त आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शेतीमध्ये यंत्रसामुग्रीचा कमी वापर आणि साठवणूक आणि वाहतुकीच्या कमी सुविधा हे आहे. यामुळे या विषयाचा साकल्याने वेध घेणे आवश्यक आहे.

चीनमध्ये धान्याचे नुकसान फक्त २.२२ टक्के आहे. भारतात ते ४.४४ टक्के आहे. फळे आणि भाज्यांचे नुकसान तृणधान्ये आणि तेलबियांपेक्षा जास्त आहे; परंतु जागतिक सरासरीच्या तुलनेत भारतात हे नुकसान कमी आहे. गुणवत्तेचा ऱ्हास हीदेखील एक मोठी समस्या आहे. आपल्या देशात धान्य, डाळी आणि तेल उत्पादनांचे नुकसान खूप मोठे आहे. फळे आणि भाज्यांचे नुकसान थोडे कमी आहे. सर्वेक्षण फक्त नुकसानीचे प्रमाण सांगते; परंतु गुणवत्तेत किती नुकसान झाले हे यावरून कळत नाही. उदाहरणार्थ पीक कापले जाते, स्वच्छ केले जाते, घरी किंवा बाजारात नेले जाते आणि नंतर गोदामे आणि दुकानांमध्ये पोहोचवले जाते, तेव्हा गुणवत्तेतही खूप नुकसान होते. 'आयसीएआर' या संस्थेतर्फे धान्याच्या प्रमाणासोबत गुणवत्तेतील तोटा मोजण्याचा प्रयत्न केला. पंजाब, मध्यप्रदेश आणि बिहारमधील काही जिल्ह्यांमध्ये भात, गहू, मका आणि सोयाबीनवर हे सर्वेक्षण करण्यात आले. १२०० शेतकरी आणि ११६ बाजारपेठांतील लोकांकडून माहिती गोळा करण्यात आली. सर्वेक्षणात सोयाबीनचे सर्वाधिक १५.३४ टक्के नुकसान झाल्याचे दिसून आले. गव्हाचे ७.८७ टक्के नुकसान झाले. धानाचे ६.३७ टक्के नुकसान झाले. मक्याचे ५.९५ टक्के नुकसान झाले. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे गव्हाच्या गुणवत्तेचे नुकसान २.२७ टक्के इतके होते. याचे कारण गव्हामध्ये ओलावा शोषून घेण्याची क्षमता असते. त्यामुळे गोदामात साठवल्यावर त्याची गुणवत्ता खराब होते. गुणवत्तेत घट होणे दर्शवते की पिकाची गुणवत्ता किती खालावली आहे.



शेतकऱ्यांच्या पातळीवर कापणीनंतरच्या नुकसानाची कारणे शोधण्यासाठी 'आयसीआरआयईआर'ने भात पिकाची निवड केली आणि तीन राज्यांमधील ६०० भात उत्पादक शेतकऱ्यांचे सर्वेक्षण केले. त्यात आढळून आले की शेत जितके मोठे असेल तितके नुकसान कमी होते. कंबाईन हार्वेस्टर वापरल्याने नुकसान कमी होते. कुटुंबप्रमुखाचे शिक्षण जितके जास्त असेल तितके नुकसान कमी होते. बाजारापासून जितके जास्त अंतर असेल तितके नुकसान जास्त. सर्वांत मोठी बाब म्हणजे लहान शेतांमध्ये जास्त नुकसान होते. शेतीचा आकार एका युनिटने वाढल्यास भाताचे नुकसान प्रति हेक्टर सात टक्क्यांनी कमी होते. भारतातील ८६ टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. त्यामुळे त्यांना जास्त नुकसान सहन करावे लागते. बिहारमध्ये लहान शेतांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे तेथे प्रति हेक्टर नुकसानही जास्त आहे. येथे लहान शेतकऱ्यांचे प्रति हेक्टर ३.५ किलो नुकसान होते, तर मोठ्या शेतकऱ्यांचे सुमारे १.१६ किलो नुकसान होते. दुसरे प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांकडे यंत्रांची कमतरता आहे. विशेषतः कंबाईन हार्वेस्टरची कमतरता आहे. कंबाईन हार्वेस्टर वापरल्याने नुकसान कमी होते. भारतात कापणीनंतर मोठ्या प्रमाणात धान्य वाया जाते. याला साठवणुकीचा अभाव, पारंपरिक धान्य व्यवस्थापन प्रणाली कारणीभूत आहे.

या समस्येवर अन्न प्रक्रिया हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. अन्न प्रक्रियेमुळे दीर्घकालीन साठवणुकीची गरज कमी होते. प्रक्रिया केलेले धान्य जास्त काळ टिकते, कारण ते खराब होण्याची शक्यता कमी असते.

सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने २०२१ मध्ये डेलॉइट नावाच्या कंपनीच्या मदतीने एक सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणातून दिसून आले की फळांच्या प्रक्रियेचे प्रमाण खूपच कमी म्हणजे ४.५ टक्के आहे. भाज्यांची परिस्थिती आणखी वाईट आहे. फक्त २.७ टक्के भाज्यांवर प्रक्रिया केली जाते. दूध प्रक्रियेचा स्तर (२१.१ टक्के) थोडा चांगला आहे. मांस प्रक्रियेची पातळी सर्वाधिक (३४.२ टक्के) आहे. माशांच्या प्रक्रियेची पातळी १५.४ टक्के आहे. अन्न प्रक्रिया क्षेत्राची वाढ केवळ अन्नपदार्थांपुरती मर्यादित नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न, रोजगाराच्या संधी आणि निर्यात बाजारपेठ यांना नवीन उंचीवर घेऊन जाते. अन्न प्रक्रिया वाढते, तेव्हा कच्च्या मालाची मागणीही वाढते. याचा अर्थ शेतकऱ्यांच्या पिकांना चांगला भाव मिळतो. प्रक्रिया क्षेत्राच्या वाढीसह शेती केवळ उपजीविकेचे साधन बनत नाही, तर एक मोठा व्यवसायदेखील बनू शकते. भारतात अन्न आणि पेयांचा व्यवसाय सुमारे ३८० अब्ज डॉलर्सचा आहे आणि यापैकी ३२ टक्के अन्न प्रक्रिया क्षेत्रातून येते. २०१४ पासून हा व्यवसाय दरवर्षी आठ टक्के दराने वाढत आहे; पण याबाबत जाणवणारी एक मोठी समस्या म्हणजे अन्नपदार्थांची नासाडी. आपल्या देशात फळे आणि भाज्यांसारख्या सुमारे ४० टक्के नाशवंत वस्तू वाया जातात. 'सीआयपीएचईटी' या सरकारी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले की, आपल्याकडे सुमारे ४.६५ टक्के ते ५.९९ टक्के धान्य वाया जाते. फळे आणि भाज्यांमध्ये सुमारे ४.५८ टक्के ते १५.८८ टक्क्यांपर्यंत नासाडी होते. २०१० मध्ये डाळींची नासाडी ४.३ टक्क्यांवरून ६.१ टक्क्यांपर्यंत वाढली; २०१५ मध्ये ती ६.३६ टक्क्यांवरून ८.४१ टक्क्यांपर्यंत वाढली. या सर्वेक्षणात असेही दिसून आले आहे की पीक काढणीनंतर होणारे नुकसान ९२,६५१ कोटी रुपयांचे आहे. यामुळे शेतीमध्ये पायाभूत गुंतवणूक आणि अन्न प्रक्रिया उद्योगावर भर देणे किती आवश्यक आहे, हे लक्षात येईल.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# न्यायालयात धाव घेण्याचा धंदा!

व्यवस्था आहे म्हणून तिचा मनमर्जीने वापर करण्याची वाईट सवय देशातल्या काही महाभागांना लागली आहे. कोणत्याही विषयात काही कारण आणि संबंध नसताना लुडबुड करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. जनहित म्हणा किंवा अन्य कोणत्या याचिकेच्या नावाने न्यायालयात धाव घेण्याचा धंदा सुरू झाला आहे. तसा हा धंदा नवा नाही पण, त्याचे प्रमाण वाढले आहे. फुकट प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचे चांगले माध्यम अनेकांना मिळाले आहे. न्यायालय वारंवार अशा व्यक्तींना फटकारते तरी सुद्धा यांची खाज काही क्षमत नाही. जमले तर जमले, नाही जमले तरी प्रसिद्धी मिळतेच, हा भाव त्यांच्या मनात तयार झाला आहे. फालतू याचिका न्यायालयात येत असल्याने प्रकरणाची संख्याही वाढते आणि त्या सुनावणीला घेतल्या की वेळही वाया जातो. अशा याचिकांमधून वेगवेगळे चुकीचे विमर्श तयार होण्याला मदत होते. परिणामी समाजात दूषित वातावरण तयार होण्यास खतपाणी घातले जाते. याशिवाय काही चांगली कामे व निर्णय अशा याचिकांमुळे बाधित होता. या याचिका फक्त सर्वोच्च न्यायालयातच येतात असे नाही. उच्च न्यायालय व त्या खालच्या न्यायालयातही जाणारे देशात कमी नाही. विशिष्ट हेतूने प्रेरित आणि चर्चेत राहण्याच्या उद्देशाने हे होते.

अगदी अलिकडे म्हणजे २२ एप्रिलला पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याच्या अनुषंगाने एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली होती. जम्मू आणि काश्मीर येथील दुर्गम व डोंगराळ भागात पर्यटकांच्या सुरक्षेची मागणी करणारी ही याचिका होती. न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या न्यायासनाने याचिकाकर्त्याला फटकारले. तुम्ही अशी जनहित याचिका का दाखल केली आहे? तुमचा खरा हेतू काय आहे? तुम्हाला या प्रकरणाची संवेदनशीलता समजत नाही का? असे अनेक प्रश्न न्या. सूर्यकांत यांनी विचारले. न्यायालयाने पुढे आपल्या आदेशात असेही म्हटले की, याचिकाकर्ता एकामागून एक जनहित याचिका दाखल करत आहे, ज्यात सार्वजनिक कारणांमध्ये कोणताही रस नसताना प्रसिद्धी मिळवणे हा प्राथमिक उद्देश असल्याचे दिसून येते. काल एक असाच निर्णय सर्वोच्च न्यायालयातून आला. मुघल सम्राट बहादूर शाह जफर (द्वितीय) यांच्या पणतूची विधवा सुलताना बेगमी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत लाल किल्ल्यावर दावा सांगितला होता. सुलताना यांनी कथितपणे बहादूर शाह जफर यांचे कायदेशीररीत्या वंशज असल्याचाही दावा केला होता. राजधानी दिल्लीतील लाल किल्ला हा मुघलांचा असून त्याचा ताबा दिला जावा, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यांची याचिका यापूर्वी दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली होती. त्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सोमवारी सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पी. व्ही. संजय कुमार यांच्या न्यायासनाने ही याचिका फेटाळून लावली. सदर याचिका गैरसमजुतीमधून करण्यात आली असल्याचे सरन्यायाधीश खन्ना म्हणाले. त्यांनी हसत हसत याचिकाकर्त्यांना म्हटले की, तुम्ही फक्त लाल किल्ला का मागत आहात? फतेहपूर सिक्री आणि ताजमहाल का नाही मागत? यावेळी याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की, दिल्ली उच्च न्यायालयाने सदर याचिका फेटाळताना मेरिटचा विचार केलेला नव्हता तर याचिका उशिरा दाखल केल्यामुळे फेटाळली होती. सर्वोच्च न्यायालयानेही असाच विचार करावा, अशी विनंती त्यांनी केली. यावर न्यायासनाने मेरिटच्या आधारावरच ही याचिका फेटाळली आहे. सदर याचिका चुकीची आणि निरर्थक असल्यामुळे ती विचारात घेतली जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करण्यात आले. देशभरातल्या ऐतिहासिक वास्तू पुरातत्त्व विभागाच्या मालकीच्या झाल्या आहे. हे माहीत असून सुद्धा खटाटोप झालाच.

समजावी म्हणून उपरोक्त दोन उदाहरणे नमूद केली आहेत. आजपर्यंत अशी अनेक प्रकरणे घडली आहेत. न्यायालयाने अनेकांना तीव्र शब्दांत फटकारले आहे. काहींना तर दंडही ठोठावला आहे. पण, पुढच्याला ठेच मागचा शहाणा हे समजून घेण्याची तयारीच नसल्याने पुढचा आणि मागचा वारंवार ठेच बसून सुद्धा सुधरताना दिसत नाही. अशा याचिकांची दाखल होण्याच्या पायरीवरच काटेकोरपणे तपासणी व्हायला हवी. त्यात खरचं काही दम असेल तरच त्या पुढे सुनावणीसाठी आल्या पाहिजेत. न्यायालयांच्या पण हे लक्षात आले आहे. केंद्र व राज्य सरकारांच्याही ते लक्षात येत आहे. जनतेलाही ते समजत आहे. यात सरकार काही करू शकणार नाही. भविष्यात न्यायपालिकाच यासाठी काही कडक नियम तयार करेल, अशी शक्यता आता खूप वाढली आहे. प्रतीक्षा करू या!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# विमर्श आणि नॅरेटिव्ह!

गत एक दोन वर्षात 'नॅरेटिव्ह' हा शब्द सर्वत्र गाजतोय. नॅरेटिव्ह किंवा फेक नॅरेटिव्ह सेट केल्यामुळे सत्ता हादरल्याचे आपण अनुभवले. त्यामुळे नॅरेटिव्हचा धसकाही अनेकांनी घेतला. काय आहे नॅरेटिव्ह? सध्याच्या परिस्थितीचा विचार करता जे खरे नाही तेच सत्य आहे हे लोकांच्या मनावर ठसविणे म्हणजे नॅरेटिव्ह होय. हीच व्याख्या मनामनात रुजली आहे. खोट्याला सत्याचा मुखवटा लावून लोकमनावर भुरळ घालून ठसा उमवटवणे म्हणजे नॅरेटिव्ह. खरं तर मूलतः नॅरेटिव्ह म्हणजे नाटक, कविसंमेलने, व्याख्याने, पथनाट्ये, सभा यांच्यासारख्या लोकरंजन माध्यमातून मुद्दा लोकमनावर ठसविणे अशा व्यापक आणि सकारात्मक अर्थाने नॅरेटिव्ह असायचा. पण हल्ली खोट्याला खरे भासविणे या फेक नॅरेटिव्हलाच नॅरेटिव्ह म्हणून प्रक्षेपित केले जात आहे. त्याअर्थाने नॅरेटिव्ह नकारात्मक आणि असत्यावर आधारित बनला. नॅरेटिव्ह डाव्या विचारांच्या किंवा वोकीझमवाल्या अर्ध्या हळकुंडात पिवळ्या झालेल्यांनी फोफावला.

याउलट उजव्यांचा विमर्श विषय आहे. विमर्श सत्यावर आधारित असून सत्य प्रस्थापित करणे म्हणजे विमर्श. सध्या विमर्श हा विषय देखील बराच चर्चेत असून अनेक कार्यकर्त्यांच्या मनात अजूनही स्पष्टता या दोन्ही विषयांबाबत दिसत नाही. सध्या सर्वच उजव्या संघटनांनी विमर्श विषयासाठी स्वतंत्र विचार करणारी चमू निर्माण केली. त्यापैकी अनेकांशी माझी चर्चा झाली. पण बहुतेकांचा संभ्रमाचा सूर दिसला. काही मित्रांनी केलेल्या सूचनेनुसार विमर्श बनाम नॅरेटिव्ह हा विषय मांडतोय. विमर्श समजून घ्यायचा असेल तर त्याआधी विचार समजून घेणे जरुरी आहे. आपण विचारविमर्श हा शब्द व्यवहारात नेहमी वापरतो. साधारणतः एकापेक्षा अधिक व्यक्ती जेव्हा चर्चा करतात तिथे आपण विचारविनिमय किंवा विचारविमर्श शब्द वापरतो.

पहिले आपण विचार म्हणजे काय? ते पाहू!

जो विषय, घटना, वस्तू त्याचे नाव काढताच त्याचे जे स्वरूप डोळ्यासमोर येते, त्याबाबतची संकल्पना आपल्या बुद्धीला ज्ञात होते त्याला विचार म्हणतात. उदा. गाय हा शब्द उच्चारला तरी तिचे स्वरूप आपल्या डोळ्यासमोर येते. लहानपणापासून पाहून पाहून वारंवारितेच्या संस्कारातून गाय हा वैचारिक ठसा मेंदूवर बसला. भगवान श्रीराम, श्रीकृष्ण आपण पाहिले नसले तरी चित्र, मूर्ती पाहून आपला तो विचार पक्का आहे. परिस, अमृत या बाबी आपण पाहिल्या नाही तरी त्यांच्याबाबतचा विचार मेंदूने निश्चित केला आहे.

विमर्श म्हणजे एखाद्या तत्त्वाला समजून उमजून, तपासून, पारखून तथ्यापर्यंत पोचणे होय. विमर्श म्हणजे एखाद्या गोष्टीचा छडा लावणे. विमर्श म्हणजे विवेचन, समीक्षा, तर्क, परीक्षण आणि बुद्धीच्या कसोटीवर वास्तविकतेपर्यंत पोचणे. विमर्श म्हणजे गुणदोष, टीकाटिप्पणी याची मीमांसा. एखाद्या विषयाचा पक्ष आणि विपक्ष यातील वास्तव समजून तथ्यापर्यंत जाणे. विमर्श म्हणजे तथ्यानुसंधान. बऱ्याचवेळा नॅरेटिव्ह म्हणजे विमर्श असा अनेकांचा गैरसमज आहे. आता नॅरेटिव्ह हा विमर्शचा दुसरा ध्रुव बनला आहे. विमर्श हा परकोटीचा सकारात्मक आणि विधायक विचार आहे. विमर्शचा एक छोटा भाग जो नकारात्मक, असत्यावर आधारित असतो त्याला हल्ली नॅरेटिव्ह म्हणतात.

विचार हा मेंदूवर ठसलेला असतो पण विमर्श मात्र अनेकांच्या वैचारिक चयापचयातून प्रस्थापित करावा लागतो. भारतीय संस्कृतीत ऋषिमुनींनी संवादातून भारतीय विमर्श प्रस्थापित केला. तो शाश्वत, अभंग आणि अभेद्य आहे. पण त्यावरही आघात करण्यात काही अंशी काहीजण यशस्वी झालेत.

विमर्श तीन प्रकारे विचारात घेतला जातो.

१) शाश्वत विमर्श, २) तात्कालिक विमर्श, ३) आपल्याला प्रस्थापित करायचा विमर्श. शाश्वत विमर्श म्हणजे ज्यात आपण परिवर्तन करू शकत नाही. उदा. सूर्य पूर्वेला उगवतो. हा विचार शाश्वत आहे. पण शाश्वत विचारांना देखील प्रस्थापित करावे लागते. भारत एक राष्ट्र आहे, हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व, वसुधैव कुटुंबकम् हा भारतीय विचार आहे. 'हिंदवः सोदराः सर्वे' हा शाश्वत विमर्श आहे पण, कारणे काहीही असोत, दुर्दैवाने झाकाळला गेला. आता बुजला गेलेला सत्यविचार पुन्हा प्रस्थापित करणे म्हणजे शाश्वत विमर्श होय.

विमर्शचा दुसरा प्रकार तात्कालिक विमर्श होय. यामध्ये चालू स्थितीत एखादा चुकीचा विचार (नॅरेटिव्ह ) कोणाकडून प्रस्थापित होत असेल तर त्यावर तातडीने प्रतिक्रिया हा तात्कालिक विमर्श होय. बहुतेक वेळा हा विमर्श नॅरेटिव्हच्या विरोधातील असतो. हा विमर्श प्रस्थापित करण्यासाठी बुद्धी, शक्ती आणि पराक्रम लागतो. अनुल्लेख, कंटाळा, आळस आणि काही होत नाही हा फाजील आत्मविश्वास तात्कालिक विमर्शसाठी घातक आहे. उदा. संविधान बदलणार हा फेक नॅरेटिव्ह का स्थापित झाला? तर याबाबत आपण पूर्णतः आळशी आणि गाफील होतो. त्यांनी नेसूची लंगोटी सोडून नेली आणि आपण दिगंबर झालो तरी आपण 'चारसौ पार' वरच गुंतून होतो. हा तात्कालिक विमर्श त्वरित प्रस्थापित करणे जरुरीचे आहे. सध्या जोरात विचार विरोधकांकडून मांडला जातो. तो म्हणजे हिंदू विचार म्हणजे केवळ संघविचार, असा विचार पुढे जाऊन हिंदू म्हणजे फक्त संघवाले बाकी सर्व इतर कोणीतरी. हा सर्वांत घातक विचार प्रक्षेपित होत आहे. हे षडयंत्र सुरू झाले आहे. यावर वेळीच उपाययोजना हा तात्कालिक विमर्श होय. मी विरोधी विचारकांशीही चर्चा करीत असतो. शिक्षणातील पंचकोष विचार हा विद्याभारतीचा विचार आहे म्हणून त्याला ते भगवीकरण म्हणून विरोध करतात. पण पंचकोष हा तैत्तिरीय उपनिषद, शंकरभाष्य, विवेकसिंधूमधील जुना विचार आहे. विद्या भारतीने त्यातून पंचकोष घेतला. स्वतः निर्माण केला नाही हे पोचणे जरुरी आहे.

तिसरा प्रकार म्हणजे विमर्श जो आम्हाला प्रस्थापित करायचा.

उदा. वाढदिवसाला केक हा आपल्या घरात इतका शिरला की तो काढणे कठीण. मम्मी, डॅडी, आँटी यात मोठेपणा. इंग्रजांनी घर ताब्यात घेतले. मुस्लिमांनी अनेक वर्ष इथे राज्य केले पण ते संस्कृती म्हणून आम्मीजान, अब्बूजान कधीच आपल्या घरात अतिक्रमित झाले नाही पण मम्मी, डॅड घुसले. पुन्हा आई-बाबा, काका-काकू, मावशी घरात प्रयत्नपूर्वक प्रस्थापित करणे, वाढदिवसाला केक न कापता ओवाळणे असे विमर्श आपल्याला प्रस्थापित करावे लागणार आहेत. विमर्श हा सत्यावर आधारित असल्याने त्यासाठी मेहनत घ्यावी लागते. मात्र नॅरेटिव्ह असत्यावर आधारित असल्याने तो सहज फोफावतो. स्पष्टच सांगायचं तर डाव्यांचा नॅरेटिव्ह आणि उजव्यांचा विमर्श असे माझे मत आहे. नॅरेटिव्हचे आयुष्य अल्प असले तरी त्याचा डंख विंचवासारखा त्वरित घातक ठरतो. विमर्श मात्र दीर्घायुत्वाय आणि शाश्वत असला तरी त्यासाठी प्रयत्न आणि वाट पाहणे (वेटिंग पीरिएड) महत्त्वाचा आहे. पण नॅरेटिव्हचा उतारा विमर्शच आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### घुसखोरांना त्वरित हाकला

गुजरात राज्यातील चंडोल गावी अनधिकृतपणे शासकीय जमिनी बळकावून शेकडो घरे बांधणारा पठाण नावाचा गुंड पकडला गेला. त्याने बांगलादेशी मुस्लिमांकडून २० हजार रुपये घेऊन त्यांना जागा दिली. या गैरव्यवहारात त्याने कोट्यवधी रुपयांची मालमत्ता उभारली आहे. गुजरात शासनाने हे प्रकरण गांभीर्याने घेऊन ती कॉलनी पूर्णपणे उद्ध्वस्त केली असल्याने इतरांचे धाबे दणाणले आहेत. आपल्या भारतात अशा जमिनी बळकावणारे हजारो पठाण प्रत्येक शहरात असून त्यांच्यावर सुद्धा कडक कारवाई होणे गरजेचे आहे. काँग्रेसच्या राजवटीत अशा भू-माफियांना स्थानिक नेते आणि पोलिसांचे संरक्षण असल्याने ते निगरगट्ट झाले आणि त्यांनी आपली साखळी तयार करून बांगलादेशी घुसखोरांकडून पैसे घेऊन शासकीय जमिनी बळकावल्या आहेत.

जमीन आणि महसूल हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीतील असल्याने केंद्रीय कायदे लागू पडत नाहीत. केंद्राची जमीन असेल तर केंद्रीय शासन विभाग कारवाई करू शकते. मात्र स्थानिक राजकीय नेते हे भ्रष्ट असतील तर त्या जमिनी देखील या गुंडाच्या तावडीत जातात. अशा अनधिकृत वस्त्यांमध्ये अनेक गैरकृत्ये फोफावतात आणि त्यांचा समाजाला उपद्रव होतो. यात बहुतांशी बांगलादेश मुस्लिम असतात, हे अनेक वेळेस सिद्ध झाले आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना परत पाठविण्यासाठी जी तीव्र कारवाई केली तशाच प्रकारची या घुसखोरांविरोधात देखील करावी. तेव्हाच त्यांचे डोके ठिकाणावर येईल, अन्यथा 'नाकापेक्षा मोती जड" अशी स्थिती यायला जास्त वेळ लागणार नाही, असे वाटते.

**संजय पाठक**/नागपूर

### वेग श्रीमंतांचा, बळी गरिबांचा

पुण्याच्या नवले ब्रिज परिसरात नुकतीच घडलेली एक हृदयद्रावक दुर्घटना, समाजातल्या वाढत्या असमतोलाची आणि बेदरकार वृत्तीची ओरडून जाणीव करून देते. एका मद्यधुंद तरुणाने भरधाव वेगाने गाडी चालवून एका पादचारी गरीब तरुणाला उडवले. हा तरुण जागीच ठार झाला. अपघात करणारा तरुण श्रीमंत घरातला असून, त्याच्याकडे महागडी कार आणि त्याचा वापर करण्याचं स्वातंत्र्यही होतं. दुसरीकडे, बळी गेलेला तरुण आपल्या रोजंदारीसाठी चालत निघालेला सामान्य कामगार होता. ही घटना 'वेग श्रीमंतीचा, बळी गरिबांचा' या वाक्याचं जिवंत उदाहरण आहे. आपल्याकडे अशा अपघातांची मालिका सुरूच आहे. बेफाम वेग, मद्यप्राशन आणि कायद्याचा धाक न वाटणं ही तरुण पिढीच्या एका वर्गाची आजची ओळख झाली आहे. दुसरीकडे, सार्वजनिक रस्त्यावर चालणाऱ्या सामान्य नागरिकांसाठी सुरक्षा ही फक्त कागदावरच उरली आहे. असे प्रकार केवळ अपघात नसून सामाजिक अन्यायाचे मूर्त रूप आहेत. श्रीमंती आणि सत्तेच्या बळावर कायद्यालाही वाकवता येते, ही धारणा जर समाजात रुजली, तर हा लोकशाहीसाठी मोठा धोका ठरेल. अशा प्रकरणांमध्ये तत्काळ आणि कठोर कारवाई झाली पाहिजे. फक्त वाहनचालक नव्हे, तर पालक, मित्रपरिवार, आणि संबंधित यंत्रणाही जबाबदार धरल्या पाहिजेत.

शहराच्या वाढत्या वाहनसंख्येवर, अपुऱ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर आणि निष्क्रिय वाहतूक नियंत्रणावरही लक्ष देणे आवश्यक आहे. प्रत्येक बळी हे एक जग हरवलेली असते आणि त्या मागे राहतात प्रश्न हा मृत्यू टाळता आला असता का? समाज म्हणून, प्रशासन म्हणून आणि व्यक्ती म्हणून आपली जबाबदारी आहे की अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत. अन्यथा, प्रत्येक वेळी रस्त्यावर पडलेलं रक्त हे केवळ अपघाताचं नव्हे, तर आपल्या सामूहिक अपयशाचं प्रतीक ठरेल.

**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

### दोन देशांच्या दोन तऱ्हा

फाळणी झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन शेजारी देशांची वेगवेगळी वाटचाल सुरू झाली. पाकिस्तानने स्वतःला इस्लामिक राष्ट्र म्हणून घोषित करत आपल्या राष्ट्रीय ओळखीचा पाया धर्मावर ठेवला. यामुळेच पुढील दशकांत पाकिस्तानात धार्मिक कट्टरतेचा उदय झाला आणि जिहाद या संकल्पनेचा वापर केवळ धार्मिक नव्हे, तर राजकीय आणि जिहाद लष्करी हेतूंसाठीही केला गेला. काश्मीरमध्ये हस्तक्षेप, आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांना आश्रय देण्याच्या घटना हे याचे ठळक प्रमाण आहेत. याउलट भारताने आपल्या संविधानात विविधतेत एकता ही मूल्यव्यवस्था स्वीकारली. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन अशा विविध धर्मांच्या लोकांनी इथे सहजीवनाचा धडा गिरवला.

भाषिक, सांस्कृतिक आणि प्रांतीय विविधता असूनही भारताने लोकशाही व्यवस्थेचा पाया घट्ट ठेवत सामाजिक सलोखा साधण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानात जिहाद ही संकल्पना राष्ट्रवादाचा एक भाग झाली, तर भारतात सर्वधर्म समभाव ही विचारधारा राष्ट्रीय एकतेचे बळ बनली. परिणामी, पाकिस्तान आंतरराष्ट्रीय मंचावर कट्टरतेचा आणि अस्थिरतेचा चेहरा बनत गेला, तर भारताने शांतता, एकोपा आणि सर्वसमावेशक तत्त्व या बळावर प्रगतीचा मार्ग स्वीकारला. आजही हे दोन देश एकमेकांच्या पूर्ण विरुद्ध सामाजिक प्रयोगांचे जणू उदाहरण आहेत. जेथे एक देश धार्मिक उग्रतेच्या दलदलीत अडकला आहे, तर दुसरा देश त्याच विविधतेच्या नात्यांमध्ये बळ शोधत आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# संक्षिप्त वृत्त...

## पूर्णा व येलदरी परिसरात कारवाई : ११ लाख ६९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील पूर्णा परिसरातील कानेगाव आणि जिंतूर परिसरातील येलदरी येथे मंगळवारी (दि.०६) वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनासह लाखोंचा मुद्देमाल स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकांनी कारवाई करून जप्त केला.

पूर्णा तालुक्यातील कानेगाव परिसरातील पूर्णा नदीपात्रात केलेल्या कारवाईत पथकाने केलेल्या कारवाईत ४ लाख ९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात एक ट्रॅक्टर, रेती काढण्यासाठी वापरात येणाऱ्या केन्या व तीन ब्रास वाळूचा समावेश आहे. या प्रकरणी पूर्णा पोलीस ठाण्यात नारायण प्रकाश पारटकर, माऊली होळकर या दोन आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

जिंतूर तालुक्यातील येलदरी बसस्थानक परिसरात केलेल्या कारवाईत पोलीस पथकाने ११ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात एक टीपर, दोन ब्रास वाळूचा समावेश आहे. यावरून जिंतूर पोलीस ठाण्यात आरोपी रामेश्वर कुंडलिक घुगे व टिपर मालकावर गुन्हा नोद करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील, पोलीस उपनिरीक्षक चंदनसिहं परिहार, अजीत बिरादार, पोलीस अंमलदार रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे, हनुमान ढगे, सिध्देश्वर चाटे, नामदेव डुबे, राम पौळ यांच्या पथकाने केली.

## पोलिसांद्वारे गंगाखेड परिसरातून ९५ हजारांचा गांजा जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड शहरालगतच्या डोंगर पिंपळा परिसरात स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने सोमवारी (दि. ५) सायंकाळच्या सुमारास कारवाई करीत ९४ हजार ७८० रूपयांचा गांजा व दुचाकी असा एकूण १ लाख ४४ हजार ७८० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान, आरोपीला पोलिसांची चाहूल लागल्याने तो तेथून फरार झाला. स्थानिक गुन्हा शाखेचे पथक गंगाखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असतांना त्यांना गावातील दत्तराव सिताराम केजगीर याच्याकडे गांजा असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने कारवाई संदर्भातील सर्व प्रक्रिया पूर्ण करून सायंकाळी सातच्या सुमारास पथक डोंगरपिंपळा येथे पोहचले. याचवेळी आरोपीला पोलिसांची चाहूल लागल्याने तो गावातून दुचाकीद्वारे फरार होण्याचा प्रयत्न करीत होता. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला असता आरोपी दत्तराव केजगीर हा परिसरातील एका पांदण रस्त्यावर दुचाकी व गांजा सोडून फरार झाला. यात पोलीस पथकाने ५० हजारांच्या दुचाकीसह ९४ हजार ७८० रूपयांचा गांजा जप्त केला आहे. या कारवाईत एकूण १ लाख ४४ हजार ७८० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी स्थानिक गुन्हा शाखेचे राजू मुत्येपोड यांच्या माहितीवयन गंगाखेड पोलीस ठाण्यात गुरनं ३२१/२०२५ मध्ये गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम २० (बी) (२) आणि २२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास लोखंडे करीत आहेत. दरम्यान, ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील, सपोनि राजु मुत्येपोड, पी. डी. भारती पोलीस अंमलदार परसराम गायकवाड, मधूकर चट्टे, निलेश भुजबळ, कागणे, दिपक मुदीराज, शेख रफीक, लोखंडे यांच्या पथकाने केली.

## सेलूत नृसिंह जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**सेलू,/प्रतिनिधी :** नृसिंह जन्मोत्सवानिमित्त प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी येथील पांडे गल्लीतील नृसिंह मंदिरमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

३ ते १४ मे पर्यंत चालणाऱ्या जन्मोत्सव कार्यक्रमात दररोज सकाळी श्रींच्या मूर्तीस अभिषेक व रात्री ८ वाजता येथील गुरुवार पाठ मंडळाच्या वतीने गणपती अथर्वशीष, रामरक्षा, गीतेचा अध्याय व विष्णुसहस्त्रनाम पठण होणार आहे. ११ मे हा या जन्मोत्सवातील मुख्य दिवस असून त्यादिवशी सायंकाळी ७ वाजता मोठ्या उत्साहात नरसिंह जन्माचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी येथील त्रिंबक वेद प्रतिष्ठानचे संस्थापक तसेच भागवताचार्य नागनाथ गुरू विडोळीकर यांच्या अमृततुल्य व रसाळ वाणीमधून नरसिंह जन्माच्या अध्यायाचे वाचन केले जाणार आहे. रात्री ९ वाजता श्रींची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

१२ मे रोजी दुपारी १ ते ३ यावेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच १३ मे रोजी सायंकाळी ६ ते ८ यावेळेत पिठलं व भाकर या प्रसादाचे आयोजन करण्यात आले असून येथील नरसिंह भक्त हेमंत दिग्रसकर हे प्रसादाचे आयोजक आहेत. १४ मे रोजी सकाळी श्री मूर्तीस अभिषेक व रात्री ८ वाजता गुरुवार पाठ मंडळाच्या विडा भजनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. या सर्व कार्यक्रमात भाविक भक्तांनी उपस्थित राहून दर्शन, जन्मकथा श्रवण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिराचे पुजारी अनंतराव पाटील, देविदास पाटील, केशव पाटील व नारायण पाटील यांनी केले आहे. संकटात भक्ताच्या हाकेला आहे त्या ठिकाणी धावून येणाऱ्या भगवान विष्णूच्या चौथ्या अवताराच्या जन्मोत्सवात अनेक भाविक भक्त आपल्या मनातील अडचणी व दुःख दूर करण्यासाठी आपली सेवा देऊन व दर्शन घेऊन या उत्सवात मोठ्या उत्साहात सहभागी होतात.

## कृषि विद्यापीठाचे तीन विद्यार्थी युपीएससी परीक्षेत यशस्वी

**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अन्नतंत्र महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या भारतीय उद्योग विकास सेवेत सहाय्यक संचालक या पदासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड झाली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत असलेले मारोती दुबे यांची सहाय्यक संचालक ग्रेड-ख या पदावर तर सध्या अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयात पीएच.डी. अभ्यासक्रमात शिक्षण घेणारे राहुल कांबळे आणि अलीकडेच एम. टेक. पूर्ण केलेले हर्षद कुरवारे यांची सहाय्यक संचालक ग्रेड-खख पदावर निवड झाली आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी–विक्री–प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# उपमुख्यमंत्री शिंदे ११ मे रोजी पाथरीत

### सईद खान यांची पत्रकार परिषदेतून माहिती, विविध विकास कामांचे भुमिपूजन होणार

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेचा भव्य मेळावा व विविध विकास कामांचे भूमिपूजन कार्यक्रम रविवार ११ मे रोजी पाथरी येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती शिवसेना नेते सईद खान यांनी दिली.

रविवारी ११ मे रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे याचबरोबर मंत्रिमंडळातील शिवसेनेचे काही मंत्री व अनेक आमदार, खासदार यांची उपस्थिती राहणार आहे. पाथरी येथील जिल्हा परिषद मैदानावर रविवारी सायंकाळी सात वाजता भव्य शिवसेना मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस शिवसेना जिल्हाप्रमुख व्यंकटराव शिंदे, पाथरी विधानसभेचे जिल्हाप्रमुख नाना टाकळकर, युवा जिल्हाप्रमुख अमोल भाले पाटील, तालुकाप्रमुख विठ्ठलराव रासवे, विधानसभा प्रमुख पप्पू घांडगे, मागासवर्गीय सेल विधानसभा प्रमुख एल आर.कदम आणि शहर प्रमुख वाहेद खान इत्यादींची उपस्थिती होती.

यावेळी शिवसेना नेते सईद खान म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नियोजित दौऱ्यात पाथरी सेलू कॉर्नर येथील शिवाजी महाराज पुतळ्याचे भूमिपूजन यासह साईबाबा मुख्य रस्त्यांचे भूमिपूजन, श्रीराम मंदिर विकास काम उद्घाटन, जनाजा नमाज हॉल भूमिपूजन इत्यादी नियोजित कामे करण्यात येणार असून, सायंकाळी जिल्हा परिषद मैदान येथे भव्य शिवसेना मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून संपूर्ण परभणी जिल्ह्यातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे व परभणी हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुनश्च एकदा सिद्ध करून दाखवावे, असे आवाहन त्यांनी केले.



## स्वच्छ व सुंदर शहर करण्यावर मनपाने व नगरपालिकेने भर द्यावा- ना.साकोरे

**परभणी,/प्रतिनिधी :** नागरिकांना चांगल्या मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच परभणी मनपा आणि जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांनी आपले शहर स्वच्छ व सुंदर करण्यावर भर द्यावा, अशी सूचना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी मनपा आयुक्त व मुख्याधिकाऱ्यांना केली.

परभणी जिल्ह्यातील मनपा व नगर पालिका क्षेत्रातील खुल्या जागा व प्रस्तावित कामांचा पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत आज आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, नगर परिषद प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त प्रदीप जगताप आदींसह सर्व नगर पालिकांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, मनपा व नगर पालिका क्षेत्रातील खुल्या जागांचा विकास करणे आवश्यक आहे. नागरिकांसाठी या ठिकाणी बगीचा, ओपन जिम, जॉगिंग ट्रॅक, मियावाकी गार्डन, नाना-नानी पार्क यासारख्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. मनपा व नगर पालिका क्षेत्रातील अशा खुल्या जागांची माहिती आपणास आठ दिवसांत सादर करावी. शहराची स्वच्छता यासह घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालय, एसटीपी प्लान्ट याकडेही लक्ष द्यावे. लोकसहभागातून शहराच्या सौंदर्यीकरणावर भर द्यावा. विशेषत: वृक्षरोपण यासारखे उपक्रम लोकसहभागातून राबवावेत. येत्या जून-जुलै महिन्यात खुल्या जागांवर वृक्ष लागवड करावी. स्वत: अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शहरात फिरुन पाहणी करावी. नाविण्यपूर्ण उपक्रम राबवून शहर सुंदर करावे.

यावेळी मनपा आयुक्त व सर्व मुख्याधिकाऱ्यांनी सादरीकरणाव्दारे खुल्या जागा व त्यावरील प्रस्तावित कामांची माहिती सादर केली. जेएमएस बायोटेकचे हरिश कुलकर्णी यांनी यावेळी तलावांचे सौंदर्यीकरण याबाबत सादरीकरण केले. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या जनजागृतीसाठी मनपाने तयार केलेल्या बोर्डचे विमोचन पालकमंत्री यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

मालमत्ता कर व नगररचना विभागाच्या अर्जांसाठी १५ मे पर्यंत शिबिरे ठेवण्यात आलेले आहे.

## परभणी जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी उद्योजकांच्या अडचणी सोडविल्या जातील- पालकमंत्री मेघना बोर्डीकर



**रामप्रसाद कंठाळे**

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी उद्योजकांच्या अडचणींचे प्राधान्याने निराकरण केले जाईल, अशी ग्वाही राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

परभणी जिल्ह्यातील औद्योगिक विकासाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत पालकमंत्री बोलत होत्या. बैठकीस भारत सरकारच्या केंद्रीय सुक्ष्म व लघुउद्योग मंत्रलयाचे (बोर्ड सदस्य) प्रदीप पेशकार, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी, परभणीचे अधीक्षक अभियंता आर.के.टेंभुर्णे, जिल्हा उद्योग केंद्र, कौशल्य विकास विभाग, एमसीईडी, जिल्हा लिड बँकेच्या अधिकाऱ्यांसह उद्योग संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी बैठकीत परभणी जिल्ह्यात महामंडळामार्फत परभणी, जिंतूर व गंगाखेड असे तीन औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यात आले आहे, तेथील स्थितीचा आढावा घेण्यात आला. तसेच परभणी जिल्ह्याच्या औद्योगिकीकरणात वाढ करण्याच्यादृष्टीने महामंडळामार्फत एकूण चार ठिकाणी (अति. परभणी टप्पा क्र.१ (मौजे बाभुळगाव व उजळंबा) ता.जि.परभणी, सेलू औद्योगिक क्षेत्र (मौजे-हदगाव खु. पिंप्रुळा व रवळगाव) ता. सेलू, अति. जिंतूर औद्योगिक क्षेत्र

(मौजे-कान्हड) ता. सेलू, मौजे पेडगाव-पान्हेरा औद्योगिक क्षेत्र ता.जि. परभणी ) येथे नव्याने औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला.

परभणी जिल्ह्याचा औद्योगिक विकास करण्यासाठी शासनस्तरावर निश्चितपणे प्रयत्न केले जातील, असे सांगून पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, उद्योजकांनीही जिल्ह्यात उद्योग वाढीसाठी पुढाकार घ्यावा.

शासनाच्या उद्योगांबाबतच्या योजनांच्या माध्यमातूनही नवीन उद्योजक तयार होणे आवश्यक आहे. यासाठी नियमितपणे बैठका घेऊन उद्योजकांच्या अडचणी प्राधान्याने सोडविल्या जातील. जिल्ह्यात टेक्सटाईल उद्योग आणण्यासाठी प्रयत्न केला जाईल. उद्योगासाठी लागणाऱ्या मुलभूत सोईसुविधा सक्षम केल्या जातील. उद्योजकांना कसल्याही प्रकारे अडचण भासू दिली जाणार नाही.

श्री. पेशकार म्हणाले की, परभणीचा औद्योगिक विकास व जीडीपी वाढवायचा असेल तर उद्योजकांना जिल्ह्यात आणण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यासाठी योग्य पध्दतीने नियोजन करणे गरजेचे आहे. यावेळी पालकमंत्री यांनी उद्योजकांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्याचे निराकरण प्राधान्याने करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## आदिती उच्च माध्यमिक विद्यालयाचा ९५ टक्के निकाल






**जिंतूर,/प्रतिनिधी- :** तालुक्यातील कुऱ्हाडी येथील स्वर्गीय राधाबाई वाहुळे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अंतर्गत चालू असलेले अदिती कला वाणिज्य व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय कुऱ्हाडी या विद्यालया अंतर्गत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये विद्यालयाचा निकाल ९५ टक्के लागला असून विद्यालयात प्रथम क्रमांक घनसावत रोहिणी संतोष ७६ टक्के , द्वितीय क्रमांक ढोणे आदित्य दतराव ७५.१७ तृतीय क्रमांक झिपरे सुमित ज्ञानदेव ७३.३३% हा विज्ञान शाखेतील निकाल आहे तर कला शाखेमध्ये प्रथम क्रमांक वैष्णवी तुकाराम ७२.८३ द्वितीय क्रमांक सूर्यवंशी आदित्य दत्ता ७०.५५ तृतीय क्रमांक गायकवाड पूजा भीमराव ६८.५० विद्यालयाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यशाची परंपरा कायम राखली आहे सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष लक्ष्मण वाहुळे प्राचार्य राहुल वाहुळे प्राध्यापक खुशाल घनसावत प्राध्यापक मुरलीधर पवार प्राध्यापक साहेब घदारे प्राध्यापक भारती शेजावळे प्राध्यापक पंकज शेजावळे सचिन इंजे शेषराव इंझे आदींनी केले आहे

## श्री.के.बा.विद्यालयाच्या मुख्याध्यापदी धारासूरकर

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज बाबासाहेब विद्यालयाच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापकपदी संस्थेने जेष्ठ क्रीडा मार्गदर्शक संजय धारासुरकर यांची नियुक्ती केली आहे.

मुख्याध्यापक बालासाहेब हळणे हे ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाल्याने १ मे पासून संजय धारासुरकर यांची निवड करण्यात आली आहे.१९९७ पासून धारासुरकर हे शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.अनेक क्रीडा स्पर्धा आयोजनात त्यांचा सिंहाचा वाटा असतो.धारासुरकर यांच्या निवडीमुळे क्रीडा क्षेत्रासह शैक्षणिक बाबींमध्ये नक्कीच चांगला बदल पहायला मिळणार आहे.त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष ऍड.अनिरुद्ध जोशी,उपाध्यक्ष डॉ सुनील कुलकर्णी,सचिव महेशराव खारकर,सहसचिव अभय सुभेदार,जयंत दिग्रसकर,ललित बिनायके,ऍड.किशोर जवळेकर,विष्णुपंत शेरे,रामेश्वर राठी,प्रवीण माणकेश्वर,डॉ प्रवीण जोग,माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक मुख्याध्यापक सिद्धार्थ एडके आदींसह शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## होर्डिंग्ज कोसळून मुलासह पिता जखमी

**परभणी-** येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ सोमवारी सायंकाळी वादळी वाऱ्याच्या वेगाने उखडलेले एक होर्डींग अंगावर कोसळून लहान मुलास पिता किरकोळ जखमी झाले.

येथील दत्तधाम परिसरातील महावीर दिगंबर आर्य हे आपल्या लहान मुलासह पुतळ्यासमोरुन मोटारसायकलवर पुढे जात होते. त्यावेळी रस्त्याच्या बाजूचे एक होर्डींग सोसाट्याच्या वाऱ्यामुळे उखडले व मोटारसायकलवर पडल्याने ते व त्यांचा लहान मुलगा किरकोळ जखमी झाला.

दरम्यान, व्यापारी प्रशांत जैन यांनी तात्काळ धाव घेवून या दोघांवर प्रथमोपचार केले व नवा मोंढा पोलिसांशी संपर्क साधून तक्रार होर्डींगधारकाविरोधात तक्रार नोंदविण्याची विनंती केली.

# सोनपेठ येथे कृषी सहाय्यकांनी केले आंदोलन

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** कृषी सहाय्यकांच्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी तालुका कृषी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वतीने बुधवार दि ७ मे रोजी सोनपेठ तालुका कृषी कार्यालय समोर एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी कार्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने आपल्या विविध प्रलंबित मागण्या संदर्भात आंदोलन पुकारले होते. त्यावेळी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी संबंधित संघटनेस १० फब्रुवारी २०२५ रोजी बैठकीस बोलावून, कृषी सहाय्यकांच्या मागण्यांची येत्या पंधरा दिवसांमध्ये सोडवणूक करू असे आश्वासित केले होते. परंतु सदर मागण्याची पूर्तता अद्याप पर्यंत




करण्यात आली नसल्यामुळे कृषी सहाय्यकांच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. कृषी सेवक कालावधी रद्द करून कृषी सेवकांना नियमित कृषी सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी, कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करावे, कृषी विभागातील डिजिटल कामकाजासाठी कृषी सहाय्यकांना लॅपटॉप द्यावा, मार्गदर्शन सूचनेमध्ये विविध योजनेत कृषी सहाय्यकांना वाहतूक भाड्याची तरतूद करावी, कृषी विभागाच्या आकृती बंधास तात्काळ मंजुरी द्यावी, पोखरा योजनेमध्ये समूह सहायकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावीत, नरेगा योजनेअंतर्गत लक्षांक देताना क्षत्रिय स्तरावरील अडचणीचा विचार करून लक्षांक द्यावा, नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे करणे व तदनंतर करावयाच्या कामाबाबत महसूल ग्रामविकास व कृषी विभागाच्या जबाबदाऱ्या बाबत योग्य न्यायसंगत कार्यपद्धती तयार करण्यात यावी, सिल्लोड तालुक्यातील कृषी सहाय्यक यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रकरणात सदर प्रकरणी विभागामार्फत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, कृषी सहाय्यक संवर्गाच्या आस्थापनाविषयक अडचणींची सोडवणूक करण्यात यावी, याप्रमाणे अनेक मागण्यांचे निवेदन तालुका कृषी अधिकारी यांना देण्यात आले आहे.

या निवेदनावर सदरील मागण्या तात्काळ पूर्ण कराव्यात अन्यथा पंधरा मे पासून सर्व योजनेच्या कामकाजावर बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेचे अध्यक्ष सचिव यांच्यासह बी. शिनगारे, के. जोगदंड, ए.शेवाळे, एम.घेवरे, एस. पवार, व्ही. राऊत, एस. वाघमारे,व्ही. इंगळे, जी. तिडके, व्ही. मोकाशे, एस. बचुटे, एस.गायकवाड, एस.मुंडे, व्हि. पंडित, व्ही. पंडीत,व्ही.चाटे,एस.नांदवटे,जी. गीत्ते,डी.लव्हाळे, एल.गर्जे, एस.शेळके ,के .बाळसकर, जी.खटींग,एम.मुंडे,आर.सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शुन्य मशागत शेती पध्दती राबवावी– गुप्ता



तभा वृत्तसेवा
हिंगोली, ७ मे

शेती सजीव करण्यासाठी तिचा कर्ब वाढविणे गरजेचे आहे. यासाठी शून्य मशागत शेती पद्धती अवलंबली पाहिजे. तसेच जिल्ह्यामध्ये किमान दहा हजार शेतकऱ्यांनी ही पद्धती स्वीकारावी यासाठी विभागामार्फत प्रयत्न करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

उमरा येथील उगम संस्थेमध्ये सगुना रुरल डेव्हलपमेंट नेरळ आणि उगम ग्रामीण विकास संस्थेच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

शून्य मशागत शेती पद्धतीचे संशोधक चंद्रशेखर भडसावळे यांनी शून्य मशागत शेती पद्धतीची निर्मिती व संकल्पना याविषयी ऑनलाईन शेतकऱ्यांशी संवाद साधताना म्हणाले, शेतकरी आनंदी झाला पाहिजे, शेतकरी जगाचा पोशिंदा आहे परंतु तो समाधानी नाही कारण शेतीमध्ये होणारा खर्च हा मोठ्या प्रमाणात आहे आणि मिळणारे उत्पन्न हे कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी मशागत टाळली तर होणारा खर्च वाचतो. त्याचबरोबर जमिनीतील जिवाणू जिवंत राहतात आणि जिवाणू कर्ब खाऊन जिवंत राहतात. जर कर्ब कमी झाला तर जिवाणूंची संख्या कमी होईल आणि शेतीवर होणारा खर्च वाढवावा लागेल. याला लगाम घालायला शून्य मशागत शेती पद्धती महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

अनिल निवळकर यांनी सगुना शेती पद्धतीमुळे माती वर्षानुसार बदलत जाते. तसेच ती थंड राहते त्याचबरोबर या शेतीमध्ये गांडूळ पाहायला मिळतात. तापमान कमी करण्यासाठी ही शेती पद्धती महत्त्वाची आहे. या पद्धतीमध्ये फक्त तणनाशकाचा वापर केला जातो. मात्र कुठल्याही प्र कारच्या रासायनिक खत किंवा औषधाचा वापर केला जात नाही. तसेच मिश्र पीक पद्धती सुद्धा या पद्धतीने मध्ये घेता येते, असे त्यांनी सांगितले.

सतीश खाडे यांनी मातीचे आरोग्य कसे तपासायचे याविषयी प्रात्यक्षिक करून दाखवले. त्याचबरोबर माती साक्षरता शेतकऱ्यांमध्ये रुजावी अशी अपेक्षा त्यांनी यंत्रणेसमोर मांडली. शेतीमध्ये जेव्हा तणाचे मूळ तसेच ठेवली जातात आणि ती जेव्हा पूर्णपणे वाळून जातात. ती मूळ पाणी जमिनीमध्ये मुरवण्यासाठी मदतीची ठरतात, असे सांगितले. परशुराम अगविले यांनी शून्य मशागत शेतीमध्ये सुरुवातीपासून तर पिकनिघेपर्यंत काय काय पायऱ्या आहेत याची माहिती शेतकऱ्यांना दिली तसेच कमी खर्चामध्ये जास्त उत्पादन देणारी पद्धतीही आहे, असेही त्यांनी सांगितले. विठ्ठलराव बदखल यांनी सांगितले की वन्य प्राण्यापासून शेतीचे संरक्षण कशा पद्धतीने केले जाते. तसेच वन्य प्राणी शेतात येत असतील तर वनविभाग कसल्या प्रकारचे मदत करू शकते हे त्यांनी सांगितले तसेच जीवित हानी मनुष्यहानी झाली तर नुकसान भरपाई काय मिळते याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

सहायक विभागीय अधिकारी सचिन माने यांनी शेती नुकसान भरपाईसाठी ऑनलाइन पद्धतीने कसा अर्ज करावा याविषयी प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. सदाशिव अडकिने यांनी जैविक बांध याविषयी मार्गदर्शन केले तसेच त्यांनी केलेली करवंदाची बाग व त्याचे फायदे शेतकऱ्यांना सांगितले. रावसाहेब मोरे व विठ्ठलराव वैद्य यांनी जालना व संभाजीनगर येथे केलेल्या शून्य मशागत शेती पद्धतीचा अनुभव शेतकऱ्यांना सांगितला व हा प्रयोग आपल्या भागात यशस्वी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी बोलताना जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी राजेंद्र कदम यांनी शून्य मशागत शेतीसाठी अधिक शेतकऱ्यांना प्रवृत करण्यात येईल. प्रामुख्याने पोकरा व नैसर्गिक शेती अंतर्गत निवडलेल्या सर्व गावांमध्ये तसेच या कार्यशाळेस उपस्थित असलेल्या सर्व गावात हा कार्यक्रम राबविला जाईल, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जयाजी पाईकराव म्हणाले, सगुणा बाग कर्जत येथे भेट देऊन तेथील माती आणि शेतीची पाहणी केली आणि ती पद्धती यशस्वी होऊ शकते. तसेच आपल्या परिसरात तसेच मॉडेल उभे राहू शकते म्हणून या कार्यशाळेचे नियोजन केले असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास कांबळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दिशांत पाईकराव, सुशांत पाईकराव, सिद्धार्थ निनुले, रामराव खंदारे, ओमकार भालेराव व बुद्धभूषण पातोडे, भीमराव पाईकराव यांनी प्रयत्न केले.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व महाबीज यांच्यात सामंजस्य करार



तभा वृत्तसेवा
हिंगोली, ७ मे

सन २०२५ पासून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा–२ अंतर्गत राज्यातील २१ जिल्ह्यांमधील ६ हजार ९५९ गावांमध्ये विविध कृषि विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत, टप्पा–१ प्रमाणेच या टप्प्यातही हवामानानुकूल पीक वाणांचे बीजोत्पादन, जमिनीच्या सुपीकतेसाठी उपाययोजना, फळबाग व बांबू लागवड, तसेच जिवाणू खतांची निर्मिती यासारख्या घटकांचा समावेश असणार आहे. यामुळे बीजोत्पादन क्षेत्राचा विकास होण्यास, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास व जमिनीच्या आरोग्यात सुधारणा होण्यास निश्चित मदत होणार आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंह आणि महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी टप्पा–२ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा झाली.

या सामंजस्य करारामुळे २१ जिल्ह्यांतील महाबीज बीजोत्पादक शेतकऱ्यांना स्रोत बियाणे किंमत आणि बीज प्रमाणीकरण नोंदणी शुल्क परताव्याच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळणार आहे. तसेच महाबीजमार्फत उत्पादित गुणवत्तापूर्ण जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा आणि जैविक खतांचा संघ महाजैविक या उत्पादनांचा शेतकरी बंधू व भगिनींना १०० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात येणार आहे. प्रकल्पातील समाविष्ट जिल्ह्यांमध्ये गळीतधान्ये व पौष्टिक तृणधान्ये लागवडीसाठी शेतकऱ्यांना मिनीकीट्स उपलब्ध करून दिले जातील. तसेच जैविक बुरशीनाशक व खते तयार करण्यासाठी प्रविण प्रशिक्षक (चरीशी ढीरळपशीं) यांना महाबीजमार्फत विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तालुका बीज गुणन केंद्रांवर (ढडऋ) बीजोत्पादन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी स्रोत बियाणे दर व बीज प्रमाणीकरण शुल्क परतावा दिला जाईल. प्रकल्प गावांमध्ये चारा पिकांचे बियाणे तयार करण्यासाठी बीजोत्पादनास प्रोत्साहन दिले जाईल.

या उपक्रमाच्या अनुषंगाने श्री. परिमल सिंह यांनी अकोला येथील महाबीजच्या बीज परीक्षण प्रयोगशाळा, बीज प्रक्रिया केंद्र आणि मुख्यालयास भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली, या प्रसंगी पोकराचे मृदाविज्ञान विशेषज्ञ विजय कोळेकर व महाबीजचे सर्व विभागप्रमुखही उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समाप्तीप्रसंगी योगेश कुंभेजकर यांनी परिमल सिंह यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# हिंगोली जिल्ह्यातील गवताचे पुणे येथील बीज संमेलनात प्रदर्शन



तभा वृत्तसेवा
हिंगोली, ७ मे

सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी सह्याद्री देवराई संस्थेकडून भारती विद्यापीठ पुणे येथे दोन दिवसीय बीज संमेलन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये विविध झाडांच्या, पिकांच्या, भाजीपाल्याच्या बियांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. उगम ग्रामीण विकास संस्था उमरा जि. हिंगोली यांच्या कडून ५५ प्रकारच्या गवताच्या हरबेरियमचे प्रदर्शन करण्यात आले होते.

गवत ही दुर्लक्षित परिसंस्था आहे परंतु गवते मानवाच्या ८० टक्के गरजा पूर्ण करतात. दूध किंवा दूधजन्य पदार्थ याचा गवताशी संबंध आहे तसेच मांसाहाराचा सुद्धा गवताची संबंध आहे. तसेच गवतामध्ये जैवविविधता वाढते हे पुणे येथील प्रदर्शनामध्ये सांगण्यात आले. तसेच गवतापासून शेतकरी आर्थिक उत्पन्न घेऊ शकतो. कारण मारवेल आणि पवना ही गवते अत्यंत उच्चप्रतीची आहेत आणि पशुधन वाढविण्यासाठी उपयुक्त आहेत. प्रदर्शनात मारवेल, पिवळा मारवेल, पसरट मारवेल, जोंधळी, पवना, डोंगरी, बोंडी, शिकाई, कुंदा, हाराळी, स्टायलो, बुरसाळी, दशरथ, पाल, चिकटा, भरडा, काळी कुसळी, खांडसुऱ्या, रेशीम काटा, लीचडा, केना, बिंडी, कोल्हा शेपूट, फुलराणी, कांडी गवत, गोंडवेल, लवंग, लव्हाळ, बोट्या, रईलोना, तांबिट, गांधी, नाचणी, पंधाड व पांढरी कुसळी इ. प्रजातीचे हरबेरियम ठेवण्यात आले होते.

उगम संस्थेच्या प्रदर्शनाला सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांनी भेट दिली तसेच उगम संस्थेचा पुरस्कार देऊन गौरव देखील केला आहे. सदरील प्रदर्शनास संस्थेचे अध्यक्ष तथा संशोधक जयाजी पाईकराव, सह संशोधक विकास कांबळे, समन्वयक धनंजय पडघन, सहायक समन्वयक ओंकार भालेराव, बालाजी मोर व शीतल कांबळे उपस्थित होते.



हिंगोली– येथील जिल्हा परिषद परिसर आणि कार्यालय परिसरात नेहमीच लोकांची गर्दी असते परंतु मागील काही दिवसांपासून उन्हाचा पारा ४० अंशाच्यावर असल्यामुळे उन्हाच्या तीव्रतेमुळे कोणीही बाहेर पडण्याची हिंमत करीत नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे सर्वत्र शुकशुकाट दिसत आहे. छाया–सुनील पाठक

## संक्षिप्त वृत्त

### परदेश शिष्यवृत्तीसाठी २० मे पर्यंत मुदतवाढ

हिंगोली– सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययन करण्यासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्तीकरिता विद्यार्थ्यांकडून जाहिरातीद्वारे अर्ज स्वीकरण्याची अंतिम दि. ३० एप्रिल, २०२५ अशी होती. परंतु यासाठी आता अर्ज स्वीकारण्यास दि. २० मे, २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी शासनाच्या संकेतस्थळावरील रोजगार या लिंकवर भेट द्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली यांनी केले आहे.

### सरजुदेवी महाविद्यालयातील विद्यार्थीनींचे यश



हिंगोली– शहरातील सरजुदेवी भिकुलाल कन्या महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीमती एम. एस. गुंडेकर (प्रभारी मुख्याध्यापिका), यु. के. येरेकार (उपमुख्याध्यापक), श्रीमती जे. एच, रितपुरकर (पर्यवेक्षिका) हे उपस्थित होते. वाणिज्य शाखेत सर्वप्रथम कु. गौरी नितिन चौरसिया ८२.१७ टक्के, द्वितीय क्रमांक कु. सिद्धी तुकाराम गिते ७९.१७ टक्के, तर तृतीय क्रमांक कु. तनवी नितीन मरळे ७७.८३ टक्के आणि कला शाखेचा निकाल १०० टक्के लागला असुन सर्वप्रथम कु. दिपाली दिलीप उबाळे ८३.५० टक्के व्दितीय क्रमांक कु. अल्का बालाजी कांबळे ८२.८३ टक्के तर तृतीय क्रमांक कु. साधना मारोती बोरकर ७९.३३ टक्के या विद्याल्याच्या यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. या विद्याल्यात एकुण कला शाखेत ७७ विद्यार्थी असुन ७७ उत्तीर्ण झाल्या आहेत तर वाणिज्य शाखेत ४३ विद्यार्थी पैकी ४१ उतीर्ण झाल्या आहेत. यशस्वी विद्यार्थिनींना संस्थेचे अध्यक्ष उग्रसेनजी राठोर, ओमप्रकाश भारूका, अनिलकुमारजी भारूका, नवनीत कुमार राठोर, रामचंद्र कयाल, सुभाषचंद्र लदनिया, विनोदकुमारजी भारूका संतोषकुमार लदनिया, अंशुलकुमार राठोर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### २७ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २७ वाहन चालकांविरूध्द जिल्ह्यात पोलिसांनी कारवाई करीत त्यांच्याकडून दंडापोटी १५ हजार ७०० रूपये वसूल करण्यात आले. अवैधदारू विक्री करणाऱ्या ५ ठिकाणी छापा मारून ३३९० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदन भरा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ७ मे

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र व संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी २०२५ या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येत आहेत. परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

शिक्षक निवडीकरीता आवश्यक किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणारे उमेदवार शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणीकरीता पात्र राहतील. त्याचप्रमाणे शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर व्यावसायिक अर्हता अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्रात प्रविष्ठ असणारे अथवा शेवटच्या सत्राच्या अंतिम परीक्षेस प्रविष्ठ असणारे उमेदवार देखील शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेस प्रविष्ट होण्यास पात्र राहतील. परंतु शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणीत त्यांनी प्राप्त केलेले गुण उघड केले जाणार नाहीत व पर्यायाने त्यांचा निकाल राखून ठेवण्यात येईल, अशा उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सदर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल १ महिना कालावधीत सादर करणे अनिवार्य आहे. या मुदतीत असे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र उमेदवाराने सादर न केल्यास शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणीतील गुणांच्या आधारे त्याचा शिक्षक पदभरतीसाठीचा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही. विहित मुदतीत गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र उमेदवाराने सादर केल्यानंतर त्यांनी प्राप्त केलेले गुण व या गुणांनुसार त्याचा निकाल स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन आवेदनपत्र लिंकवर भरावेत, असे आवाहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# शिवाजी महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९६.७० टक्के



तभा वृत्तसेवा
हिंगोली, ७ मे

शहरातील श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी यांचा इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेच्या निकालात उतुंग भरारी घेत विद्यार्थिनी घवघवीत यश संपादन केले.

यावेळी विज्ञान शाखेतून कीर्तिका लाहोटी ह्या विद्यार्थीने ५४६ गुण घेऊन ९१ टक्के मार्क्स मिळवत महाविद्यालययातून प्रथम क्रमांक मिळविला आहे.

पुष्पक कान्हेड या विद्यार्थी याने ८०.३३% मार्क घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तर इंगळे सम्यक ७९.५०% मार्क्स घेऊन महाविद्यालयातून तृतीय क्रमांक मिळविला आहे. त्याचबरोबर कलाशाखे मधून फातेमा बेगम शेख या विद्यार्थी ने ७९ टक्के घेत कला शाखेमधून प्रथम क्रमांक मिळविला. त्याचबरोबर लोणकर राणी किशोर हिने ७६.६७% मार्क मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच लोणकर शितल विजय ६९.५०% मार्क्स मिळवत महाविद्यालयातून तृतीय क्रमांक मिळवला. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्षा मंदाताई पवार, प्रणव पवार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. क्षीरसागर अधीक्षक उत्तम जाधव डॉ. निवृत्ती हुरगुळे डॉ.किशोर इंगोले डॉ. संदीप लोंढे, प्रा. प्रियंका पवार, प्रा आशिष इंगळे प्रा. कैलास मांडगे विजय पवार, सुभाष झरे, सुनील राठोड यांची उपस्थिती होती.

# गौण खनिज वाहतुकीच्या संशयाची सुई परभणी तहसील कार्यालयाकडे

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ७ मे

वसमत येथील मदिना चौक भागातील हायवा मालकाने सादर केलेल्या माती वाहतुकीच्या पावत्यांमध्ये खाडाखोड आढळून आली असून इटीपी नंबरवरील वाहनाचा क्रमांक व प्रत्यक्षात पावतीवरील क्रमांक वेगवेगळा आढळून आला आहे. सदर पावती परभणीच्या तहसील कार्यालयाकडून देण्यात आल्यामुळे आता बनावट पावती प्रकरणात संशयाची सुई परभणीच्या तहसील कार्यालयाकडे दिसू लागली आहे.

वसमत येथील मदिना चौक भागात एका हायवा चालकाचे वाहनांवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात २ जण ठार तर चौघे गंभीर जखमी झाल्याची घटना तीन दिवसांपूर्वी घडली होती. या हायवा वाहनांमध्ये असलेली माती परभणी जिल्ह्यातून वसमत येथभल कौठा रोड भागातील वीटभट्टीलसाठी नेली जात असल्याचे स्पष्ट झाले होते. दरम्यान,सदर वाहनातून माती वाहतुकीच्या परवान्याची पावती सादर करण्याच्या सूचना उपविभागीय अधिकारी विकास माने आणि तहसीलदार शारदा दळवी यांच्या पथकाने वाहन मालकास दिल्या होत्या. त्यावरून वाहन मालकाने माती वाहतुकीची पावती तहसील कार्यालयाकडे सादर केली. या पावतीची खात्री करून घेण्यासाठी पथकाने पावतीवरील ईटीपी क्रमांक २३५७२१३८ याची पडताळणी केली. मुळ पावतीवर माती वाहतुक परभणी तालुक्यातील देवठाणा गट क्र ११२ मधील एक एकर क्षेत्रातून ५०० ब्रास साठी परवानगी देण्यात आल्याचे दिसून आले. सदर पावतीवर तहसील कार्यालयाची स्वाक्षरी आहे. मात्र पावतीच्या दिनांकावर खाडाखोड केल्याचे दिसून आले असून ता ३ मे २०२५ सकाळी ११.२५ ता ३ मे दुपारी ३.२५ या कालावधीसाठी पावती वैध असल्याचे दिसून आले. यासाठी पावतीवर वाहनाचा क्र एमएच २० ९७९७ नमुद करण्यात आला आहे. यामध्ये चालकाचे नाव इरफान तर परवानाधारकाचे नाव दिपक असल्याचे नमुद आहे.मात्र पावतीवरील खाडाखोड लक्षात घेता प्रशासनाने व्हेइकल मॉनिटरींगची ऑनलाईन तपासणी केली असता सदर ईटीपी क्र २३५७२१३८ हा दि २१ एप्रील रोजी सकाळी १०.११ वाजता असल्याचे दिसून आले. वाहनाच्या माहीतीमध्ये एमएच १७ सीव्ही ६७७७ या वाहनासाठी पावती दिल्या गेली असून त्यात मालकाचे नाव प्रवीण घुगे आहे.

# वसमत नगर परिषदेत नगरोत्थान योजनेत भ्रष्टाचाराची कुजबुज?

तभा वृत्तसेवा
वसमत, ७ मे

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत वसमत नगर परिषद हद्दीत सुरू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांमध्ये गंभीर भ्रष्टाचार आणि निधी अपहाराच्या तक्रारी समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर काही सजग नागरिकांकडून सातत्याने माहितीची मागणी व तक्रारी केल्या जात असताना, प्रशासनाकडून मात्र जुने अहवाल दाखवून दिशाभूल केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता, नांदेड यांनी कार्यकारी अभियंता हिंगोली यांना पत्राव्दारे स्पष्ट निर्देश दिले आहेत की, संबंधित प्रकरणी सातत्याने विचारणा होत असल्याने आपण स्वतः लक्ष घालून आवश्यक कार्यवाही करावी व तिचा वस्तुनिष्ठ अनुपालन अहवाल, आवश्यक कागदपत्रांसह तातडीने सादर करावा. अन्यथा भविष्यातील परिणामांना आपण स्वतः जबाबदार असाल.

असे असतानाही, कार्यकारी अभियंता हिंगोली यांच्या कार्यालयाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. यावरून संबंधित अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराचा व निष्काळजीपणाचा गंभीर आरोप नागरिक करत आहेत. इतकेच नव्हे तर, अभियंत्यांकडून पत्रांना प्रतिसाद न देणे, अहवाल सादर न करणे आणि कामांची चौकशी न करणे ही बाब लक्षवेधी असून, यामागे कोणाच्यातरी पाठबळ असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर, सदर प्रकरणाची विभागीय चौकशी व्हावी, भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. संबंधित विभागीय यंत्रणांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेणे आणि पारदर्शक चौकशीसाठी पुढाकार घेणे गरजेचे झाले आहे.

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने १० मे रोजी परळीत आगळावेगळा सामूहिक विवाह सोहळा

**हुंडा न देण्याची आणि न घेण्याची दिली जाणार शपथ; चार हजार पाहुण्यांची असणार उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मे**

ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने ११ गरीब कुटुंबातील जोडप्यांचा आगळा वेगळा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या बाजूला असलेल्या हलगे गार्डन येथे दिनांक १० मे रोजी दुपारी १२.३० वाजता या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, जवळपास ४ हजार पाहुणेमंडळी या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत.

ग्लोबल विकास ट्रस्टचे संचालक मयंक गांधी यांच्या वतीने परळी तालुक्यात मोठी सामाजिक चळवळ उभी करण्यात आली आहे. ट्रस्टच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येतात. याच ट्रस्टच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप खेरुका यांचे कुटुंब, त्यांच्या कन्या अलकनंदा रूईया आणि जावई यांच्या वतीने ११ गरीब जोडप्यांच्या विवाहासाठी १५ लक्ष रुपयांची मदत देण्यात आली आहे. लंडन येथे झालेल्या लग्न सोहळ्याच्या निमित्ताने ही देणगी संबंधित कुटुंबाने दिली आहे. आजमितीस अनेक अशी कुटुंबे आहेत ज्यांना की मुलींच्या लग्नाचा भर झेपत नाही. यातूनच अनेकांच्या आत्महत्या होतांना ग्लोबल विकास ट्रस्टने अनुभवलेले आहे. या समस्यांवर उपाय म्हणून हा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न होत आहे. या विवाह सोहळ्यात हुंडा न देण्याची आणि न घेण्याची शपथ दिली जाणार आहे.

ग्लोबल विकास ट्रस्टकडून नवदाम्पत्याला सर्व संसारोपयोगी साहित्य भेट म्हणून दिले जाणार असून, प्रत्येक जोडप्याच्या नावे संयुक्तरीत्या ७० हजार रुपयांच्या मुदत ठेव (fix deposit) प्रमाणपत्र त्यांना दिले जाणार आहे. या आगळ्यावेगळ्या सामुदायिक विवाह सोहळ्यास सुमारे चार हजार पाहुणेमंडळी उपस्थित राहणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

## शिवा संघटनेच्या भजनगायन स्पर्धेत शंभु महादेव भजनी मंडळ प्रथम

महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त घेण्यात आल्या भजनी मंडळाच्या गायन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.७ मे**



महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने दि.४ मे रोजी भजनी मंडळ गायन स्पर्धा घेण्यात आल्या.या स्पर्धेत प्रथम पारितोषिक परळीच्या शंभु महादेव सेवाभावी भजनी मंडळाने पटकावले.विजेत्या महिला भजनी मंडळांना समाजबांधवांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले.

शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने दरवर्षी क्रांतीसुर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त विविध समजोपयोगी कार्यक्रम राबविले जातात. यावर्षी जयंती दिनी महात्मा बसवेश्वर प्रतिमा पूजन,महात्मा बसवेश्वर चौक सुशोभीकरण हे कार्यक्रम घेतल्यानंतर रविवार दि.४ मे रोजी संत गुरुलिंगस्वामी मठ,बेलवाडी येथे भजनी मंडळ स्पर्धा घेण्यात आल्या.यामध्ये प्रथम पारितोषिक शंभु महादेव सेवाभावी भजनी मंडळ,द्वितीय पारितोषिक वैजनाथ भजनी मंडळ तर तृतीय पारितोषिक हरिहर भजनी मंडळाने मिळवले. विजेत्यांना रोख रक्कम,स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र व शिवा संघटनेचा मानाचा रुमाल देऊन माजी आमदार संजय दौंड,भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे,दत्ताप्पा ईटके,डॉ.सुरेश चौधरी,सुर्यभान मुंडे,रमेश चौंडे,आदींच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.पत्रकार मोहन व्हावळे,धनंजय आढाव,महादेव शिंदे,अश्विन मोगरकर,नितीन समशेट्टे,माजी सभापती गोपाळ आंधळे,श्रीराम लांडगे आदींनी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टी च्या शहराध्यक्ष पदी सौ.उमाताई समशेट्टे व हनुमान व्यायाम शाळेच्या अध्यक्षपदी वैजनाथ ईटके यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.या स्पर्धेचे परीक्षक म्हणून भरत महाराज सोडगिर व कृष्णाजी बळवंत यांनी परीक्षण केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवा संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल अष्टेकर यांनी तर आभार प्रदर्शन शहराध्यक्ष गणेश वारकरे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समीर कोरे,दर्शन सपाटे,लहु हालगे, निलेश राजनाळे,अनिकेत तिळकरी, मधुकर व्यवहारे,योगेश गोपनपाळे, संदिप बावगे,सोमनाथ खोत,संकेत खके आदींनी परिश्रम घेतले.

## संत बंकटस्वामी महाराज यांनी तळागाळात परमार्थ रुजवला.. त्यामुळे अध्यात्मिक क्रांती झाली – महादेव महाराज चाकरवाडीकर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मे**

०७ संत बंकटस्वामी महाराज यांनी तळागाळात परमार्थ रुजवला. त्यांच्यामुळेच अध्यात्मिक क्षेत्रामध्ये खूप मोठी क्रांती झाली असं प्रतिपादन श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प सत्यवान महाराज लाटे, श्री ह भ प विष्णुपंत लोंढे गुरुजी, श्री ह भ प बाबासाहेब महाराज कदम, श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.

वारकरी संप्रदायातील महानसंत बंकट स्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास मंगळवारी थाटात सुरुवात झाली पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेतील पहिलाच अभंग चिंतन रुपी सेवेकरता निवडला.


समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ।।१।।
आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त्त नको देवा ।।ध्रु.।।
ब्रम्हादिक पदें दुःखाची शिराणी ।
तेथें दुश्चिंत झणी जडों देसी ।।२।।
तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म ।
जे जे कर्मधर्म नाशवंत ।।३।।

या अभंगावर चिंतन मांडताना महादेव महाराज यांनी जगद्गुरु तुकाराम महाराज यांची अभंग गाथा निर्मिती कशी झाली याचा इतिहास सांगितला. संत नामदेव महाराजांनी पांडुरंगाच्या समोर केलेली शतकोटी तुझे करीन कवित्व ही प्रार्थना आणि त्यानंतर नामदेव महाराजांचा अवतार असलेल्या तुकाराम महाराजांनी अभंग गाथा लिहिला या गाथेतील पहिलाच अभंग हा मंगल करणारा आहे. कोणतेही काम करायच असेल तर मंगल करावे लागते. आज बंकट स्वामींच्या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात होत असल्याने हा वस्तू निर्देशनात्मक मंगल करणारा अभंग यावर चिंतन मांडले..

## प्राप्त तक्रारींवरुन बोगस डॉक्टर्सची यादी तयार करा–जिल्हाधिकारी

### नागरिकांनी माहिती देण्याचेही आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मे**



जिल्हयात बोगस डॉक्टर संदर्भाने आलेल्या तक्रारीनुसार संशयित डॉक्टर्सची यादी तयार करुन त्यावर वेळोवेळी तपासणी करुन याबाबत कारवाई करावी असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज दिले.

जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीची त्रैमासिक सभा आज झाली यात त्यांनी आतापर्यंतच्या कार्यवाहीचा आढावा घेतला. गेल्या ९ महिन्यात तालुकास्तरीय तपासणी पथकाने ३ ठिकाणी तपासणी केली मात्र असे डॉक्टर त्या ठिकाणी आढळून आले नाहीत असे सांगण्यात आले.

नागरिकांना आवाहन

आपल्या गावात कोणी बोगसपणे वैद्यकीय व्यवसाय करीत असेल तर नागरिकांनी आपापल्या भागातील तालुका आरोग्य अधिकाऱ्याकडे तक्रार द्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी नागरिकांना केले आहे.

तालुक्यासह गावपातळीवर ए.एन.एम. तसेच आशा वर्कर यांच्या माध्यामातून लक्ष ठेवण्याची आणि माहिती मिळवण्याची सुरुवात करा असे निर्देश त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना दिले.

आतापर्यंत आलेल्या तक्रारींचा पाठपुरावा करण्यासाठी तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांना सांगण्यात यावे जेणेकरुन अशा बोगस डॉक्टर्सवर गुन्हे दाखल करता येतील असेही जिल्हाधिकारी म्हणाले.बैठकीस समितीचे सदस्य सचिव प्र. पोलीस अधिक्षक उमाशंकर कस्तुरे तसेच सर्व समिती सदस्यांची उपस्थिती होती.

## स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात भारतमाता की जय च्या जोरदार घोषणा.

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मे**



भारतीय सैन्याने पहलगाम हमल्याचा बदला घेतला. सिंदुर ऑपरेशन अंतर्गत आतंकवाद्यांना कंठस्नान घातले. प्रत्येक भारतीयाला याचा अभिमान आहे. हाच आनंद स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात साजरा करण्यात आला. विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा उमेश जगताप, मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, उपमुख्याध्यापक श्री माधव जोशी, विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे व इतर शिक्षक सहकारी गण यांनी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन केले व भारतमाता की जयच्या जोरदार घोषणा दिल्या व आनंदोत्सव साजरा केला आणि भारतीय सेना व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

## मृत्यू टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन आवश्यक–प्रादेशिक परिवहन अधिकारी दिपाली जाधव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मे**




रस्ते अपघात,मृत्यू हे टाळता येतात मात्र त्यासाठी परिवहन विभागाने दिलेले नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे रस्त्याच्या कडेला असलेल्या सावधगिरी निर्देशक चिन्ह व माहिती देणारी चिन्ह याकडे वाहन चालकाचे तसेच सर्वसामान्य महिला,नागरिक यांचे लक्ष असावे लागते रस्त्याने पायी चालतानाही सावधगिरी बाळगणे जरुरीचे आहे उजवी बाजू चालण्यासाठी असून रस्ते ओलांडताना वाहने पाहूनच तो ओलांडावा असे मत लातूर येथील प्रादेशिक परिवहन अधिकारी दिपाली जाधव यांनी व्यक्त केले योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे न्यास यांच्या वतीने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिरात त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनीचे यांचे प्रमुख,संचालक आर.व्ही.सोनवळकर होते त्यांनीहीअध्यक्षीय समारोपात मनोगत व्यक्त केले यावेळी दिपाली जाधव यांचे स्वागत योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले

संचालन राजकिरण पाटेकर तर आभार वैष्णवी वाघमारे हिने मानले.कार्यक्रमासाठी क्रीडा प्रबोधिनी सदस्य, प्राध्यापक,कर्मचारी उपस्थित होते.

## बीड शहराच्या गंभीर पाणीप्रश्नावर पालकमंत्री व नगरविकास मंत्र्याच्या उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रकार

जिल्हाप्रमुख उल्हास गिराम याचा उपरोधीक टोला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मे**



बीड शहरातील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी अहोरात्र भटकंती करावी लागत असून नगरपरिषदेच्या ढिसाळ आणि नियोजन शून्य कारभारामुळे बीडकरांना माजलगाव तलावात पाणी उपलब्ध असताना घोटभर पाणी मिळणे मुश्किल झाले आहे अशा पाणी संकटावेळी संवेदनहीन नगरपालिका प्रशासनाला पाण्यासाठी जनता टाहो फोडत असताना कधी जाग येणार आहे?

मोठा गाजावाजा करून बीडला पालकमंत्री म्हणून आलेले उपमुख्यमंत्री अजित पवार व नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ बीडला येऊन प्रशासनाची बैठक घेऊन पाणी प्रश्न मार्गी लावणे अपेक्षित असताना हे दोन्ही उपमुख्यमंत्री फोनवरून सूचना देत आहे हे म्हणजे उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रकार आहे असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले आहे

पाणी प्रश्न सत्ताधारी हे जिल्हाधिकारी यांना निवेदन देत आहे तर कुणी न पवार मोर्चा काढत आहे कुणी पत्रकावर समाधान मानत आहे सत्ता असतानाही त्यांच्यावर ही वेळ येणे दुर्दैवी असून यावरून हेच सिद्ध होते की हे सरकार गेंड्याची कातडी पांगरलेली आहे पण बीड शहरातील जनतेच्या हे पूर्ण लक्षात आले असून फक्त मतांसाठी पत्रक बाजी करायची ह्या पत्रकार नेत्यांना खरंच बीडच्या पाणीप्रश्नाची तळमळ असती तर नगर विकास मंत्री व पालक मंत्र्यांना बीडला बोलावून प्रशासनास बैठक घेऊन पाणी देण्यास भाग पाडले असते पण पाणी प्रश्नातही त्यांना राजकारण सुचते पण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष बीड शहरातील जनतेच्या पाणी प्रश्न बाबत प्रामाणिकपणे लढत असून लवकरच हा पाणी प्रश्न सोडवून घेणार असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी व्यक्त केला आहे.

## तब्बल ३५ वर्ष नगरपालिकेची सत्ता भोगणाऱ्या क्षीरसागर नी बीड शहरवासीयांना पाईपलाईन मध्ये मरून पडलेल्या सडलेल्या कुत्र्याचे पाणी पाजून कुठला पुरुषार्थ साध्य केला–नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मे**



बीड नगर परिषदेमध्ये गेल्या तब्बल ३५ वर्षापासून क्षीरसागरांची सत्ता आहे क्षीरसागर नुसते फुसके वचने देऊन लोकांना भूलथापांना बळी पडतात हे जनतेला आता कळून चुकले आहे बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात असे बोलणारे शिरसागर यांना आता जनतेने त्यांची जागा दाखवण्याची वेळ आलेली आहे बीडमध्ये कुठल्याही निवडणूक जवळ आली की मग नगरपालिकेची निवडणुक असो किंवा विधान परिषदेची किंवा लोकसभेची निवडणुक असो अशा निवडणुका जवळ आल्या की आम्ही हे करू आम्ही ते करू नुसते खोटे आणि भूलथापाचे आश्वासन देणारे हे क्षीरसागर मात्र आता फेल ठरले आहेत त्यांनी गेले ३५ वर्ष बीड नगर परिषदेची सत्ता स्वतःची खळगी भरण्यासाठी व काही बगलबच्चाची खळगी भरण्यासाठी भोगली आहे परंतु त्यांना पाईपलाईन व्यवस्थित बीड शहराला पाणीपुरवठा करणारी करता आली नाही आत्ताच एका वर्तमानपत्र मध्ये एक बातमी प्रकाशित झाली की बीडला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन मध्ये एक ते दोन असे मेलेले सडलेले अवस्थेत असलेले कुत्रे दिसून आले तेच पाणी बीड करांनी पिले आहे आता याचे परिणाम येणाऱ्या भविष्य काळामध्ये नागरिकांच्या आरोग्यावर काय होणार आणि याला जबाबदार कोण असणार हा देखील प्रश्न आता बीड शहरातील नागरिकांना पडला आहे अनेक वेळेस माणसाच्या विष्ठेचे देखील पाणी बिडकर यांना प्यावे लागत आहे असे घाणीच्या साम्राज्याच्या समोर बीड शहरवासीयांना रोज सामना करावा लागत आहे मग बीड शहरांमध्ये रस्ते ना दुरुस्त असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना देखील त्याचा त्रास सहन करावा लागत आहे आता काही दिवसावरच पावसाळा येऊन ठेपला आहे बीड शहरातील काही भागांमध्ये मग धानोरा रोड असो किंवा अन्य बीड शहरातील भागामध्ये रस्ता देखील व्यवस्थित नाही खड्डेची खड्डेच पडलेले आहेत मग आता येणाऱ्या पावसाळ्यात विद्यार्थ्यांना नागरिकांना आबाल वृद्ध नागरिक यांनी कसे यायचे जायचे कसे जायचे रस्त्याने याचा देखील प्रश्न पडलेला आहे हे रस्ते देखील क्षिरसागर यांना व्यवस्थित करता आले नाही बीड शहराला २० २० दिवसांनी पाणीपुरवठा होतो हे दुर्दैव आहे ते पण कुत्रे मरून पडलेल्या पाईपलाईन द्वारे माणसाने विस्टा केलेले देखील त्या पाईपलाईन मध्ये काही वेळेस नागरिकांना दिसून आले ते पाणी देखील बिडकर यांना पिण्यासाठी देण्यात येते मग हा सगळा बीड नगरपालिकेचा भोंगळा कारभार चाललेला क्षीरसागर यांना माहीत नाही का का ते नुसतेच मतदानापुरते लोकांच्या समोर येतात म्हणून असे घाण साम्राज्य असलेले पाणी पाजून बीड शहर वाशीयांना क्षीरसागर यांनी कुठला पुरुषार्थ साध्य केला आहे ते त्यांनी पत्रकार परिषद घेऊन जनतेसमोर स्पष्ट करावे आता शिरसागर यांना कायमस्वरूपी जनतेने घरी बसवण्याची वेळ आली आहे नागरिक त्यांना कायमचे आता येणाऱ्या काळामध्ये घरी बसवल्याशिवाय राहणार नाहीत असे देखील चर्चा सध्या बीड शहरांमध्ये होत आहे.

## बीड शहराच्या संदर्भात आ.क्षीरसगरांनी घेतली जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक

### पावसाळ्यापूर्वी स्वच्छता कामे, टॅक्स रिव्हीजनसह, नगर रोडवरील रस्ता क्रॉसिंग या महत्वाच्या मुद्यांवर झाली सविस्तर चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ मे**

पावसाळ्याच्या पूर्वी शहरातील नालेसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन करणे तसेच बीड नगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) करण्यासाठी सुव्यवस्थित करणे तसेच बीड शहरातील नगर रोडवर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना नगर नाका यांमध्ये रस्ता क्रॉसिंग अशा विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.७) रोजी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत बैठक घेतली.




बीड शहरात पावसाळ्याच्या अगोदर नालेसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन इत्यादी कामे होणे गरजेचे आहे. जेणेकरून नागरिकांचे आरोग्य आणि शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होणार नाही. यासोबतच बीड नगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत सुव्यवस्थित नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. यासोबतच नगर रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुना नगर नाका यादरम्यान सर्व शासकीय कार्यालये आहेत. परंतु याठिकाणी एकही रस्ता क्रॉसिंग नाही त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. बीड शहाराच्या अनुषंगाने या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. दरम्यान पावासाळ्यापूर्वी स्वच्छतेची कामे करण्यासाठी योग्य नियोजन करण्याबाबत तसेच नगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी चतुर्थ कर आकारणी (टॅक्स रिव्हीजन) च्या संदर्भात आराखडा तयार करून त्याचेही सुव्यवस्थित नियोजन करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका प्रशासनाला सूचित केले. यासोबतच नगर रोडवर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक रस्ता क्रॉसिंग करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, माजी आ.सय्यद सलीम व नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## सानिका बहीर चे बारावी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**नवगण राजुरी दि.७ मे**



येथील सानिका सतीश बहीर या विद्यार्थिनीने बारावीच्या परीक्षेत ९१.१७% गुण मिळून घवघवीत यश मिळविले आहे.

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु.बहीर सानिका सतीश हिने बारावीच्या परीक्षेत ६०० पैकी ५४७ म्हणजेच ९१.१७% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले . पिकशास्त्र विषयात २०० पैकी २०० गुण मिळाले. तर जिवशास्त्र विषयात १०० पैकी ९४ गुण मिळाले तिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# किनवट पोलीस वसाहतीसाठी २५ कोटीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात

## आ. भीमराव केराम यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ०७ मे-**

किनवट पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या शासकीय निवासस्थानांची झालेली दुरवस्था आणि त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना भाडे तत्वावर खासगी जागेत राहावे लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर, आमदार भिमराव केराम यांनी या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत राज्याचे पोलिस महासंचालक यांना दिनांक ०३ मार्च २०२५ रोजी पत्राद्वारे सविस्तर मागणी केली होती.

या पत्रात त्यांनी नमूद केले होते की, सध्या पोलिस वसाहतीतील इमारती या निजाम काळातील असून मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे त्या राहण्यासाठी पूर्णतः अयोग्य ठरत आहेत आणि यामुळे किनवट पोलिस स्टेशनमध्ये मनुष्यबळाची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर बाधित होत आहे.



या मागणीची गांभीर्याने दखल घेत, राज्याचे पोलिस महासंचालक यांनी सदर प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर केला असून, किनवट येथील पोलिस वसाहतीसाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्याचा प्रस्ताव सध्या अंतिम टप्प्यात आहे. लवकरच या प्रस्तावाला मंजुरी मिळणार असल्याचे पत्राद्वारे आ. केराम यांना कळविण्यात आले आहे.

या कामाच्या अनुषंगाने दिनांक ०७ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्याशी तउ द्वारे बैठक पार पडली. या बैठकीत टाईप-०३ ची एकूण ६ निवासस्थाने आणि टाईप-०२ ची ६४ निवासस्थाने अत्यावश्यक असल्याचे ठरवण्यात आले असून, त्याच्या मंजुरी प्रक्रियेला आ. भिमराव केराम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गती मिळाली आहे.

या महत्त्वाच्या विकास कामात आ. भिमराव केराम यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाने आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे किनवट शहराच्या पोलिस प्रशासनाला नवसंजीवनी मिळणार आहे. येत्या काळात या नव्या निवासस्थानांच्या उभारणीमुळे पोलिस कर्मचाऱ्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होणार असून, किनवट पोलिस स्टेशनमध्ये मनुष्यबळाची उपलब्धताही अधिक सुलभ होणार आहे. या ठोस आणि जनहिताच्या कामाबद्दल नागरिकांतून आमदार केराम यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# हडको भागातील ड्रेनेजच्या कामाचा आ.बोंढारकर यांच्या हस्ते शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ०७ मे-**

झोन क्र. ६ हडको भागातील सामाजिक कार्यकर्ते यशवंत आवाळे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी रस्ते, नाली, ड्रेनेज आदी नागरी सुविधा पुरवाव्यात या मागणीसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कार्यालयासमोर ५ फेब्रुवारी रोजी भव्य मोर्चा काढून उपोषण केले होते. त्यावेळी महापालिका प्रशासनाने लवकरच या भागातील कामे पूर्ण करू, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार या भागात ड्रेनेजच्या कामाचा शुभारंभ बुधवारी आ. आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आला.

नवीन नांदेड शासनाच्या अमृत दोन योजनेअंतर्गत नांदेड शहरातील महापालिका अंतर्गत २९ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केलेला आहे, त्या अंतर्गत जिंदमनगर, कंथकनगर, चेतकनगर, विठ्ठलराजनगर आदी भागात एसटीपी उभारून अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम दि ७ मे रोजी नांदेड दक्षिणचे आ आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते शुभारंभ करून कामास सुरुवात करण्यात आली.



या कामास गोपाळचावडी ग्रा.पं.चे उपसरपंच साहेबराव पाटील सेलूकर यांनी पुढाकार घेऊन ड्रेनेज पाईप लाईनचा मार्ग मोकळा करून दिला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते यशवंत आवाळे, शिवसेनेचे महानगराध्यक्ष तुलजेश यादव, शिवसेना ओबीसी व्हिजे एनटी जिल्हाप्रमुख अनिल धमने, सदाशिव कदम, श्याम जाधव, सरपंच प्रतिनिधी प्रदीप लाखे, आशीर्वाद डाकोरे, साहेबराव जोंधळे, शाकीर शेख, अशोक बनसोडे, मनोज नांदेडकर, अजय खटके, फेरोज शेख, त्रिशला कांबळे, पूजा सोनसळे, सविता कांबळे, संगीता चव्हाण, चंचला ठाकूर, माडगेवार बाई, बाळू सोळंके, चांदमिया साब, बजरंग ठाकूर यांच्यासह महिला व पुरुषांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### सिडको येथील कुसुमताई उच्च माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**नवीन नांदेड** -महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे बारावी बोर्डाच्या शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत कुसुमताई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम ठेवत घवघवीत संपादन केले आहे. सिडको येथील कुसुमताई उच्च माध्यमिक विद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेत बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९६.५७ टक्के तर कला शाखेचा निकाल ८०. २१ टक्के यश संपादन केले आहे. एकूणच कुसुमताई विद्यालयाचा निकाल ९०.२४ टक्के लागला असून पुन्हा एकदा सिडको हाडको परिसरात इतर महाविद्यालयाच्या तुलनेत अव्वल स्थान पटकावले आहे. कुसुमताई उच्च माध्यमिक विद्यालयातून विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी कु. प्रतीक्षा मुंडे ८७.८५ टक्के मार्क घेऊन विद्यालयात प्रथम तर अक्षय शिंदे यांनी ८७.६५ टक्के मार्क घेऊन द्वितीय आणि वर्धित शिंदे ८४.१७ टक्के मार्क घेऊन तृतिय आला आहे. विज्ञान शाखेतून ८ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह व ३० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच कला शाखेचा १ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह तर १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव संभाजी बिरादार व प्राचार्य शेशिकला जाधव तसेच सर्व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### वासवी माता जयंती उत्साहात साजरी

**हदगाव**-हदगावातील आर्य वैश्य समाजाच्या वतीने आर्य वैश्य समाजा चे आराध्य दैवत कुलस्वामिनी माता वासवी देवीची जयंती मोठ्या उत्साहात आर्य समाज हदगाव येथे साजरी करण्यात आली.याप्रसंगी वासवी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून महाआरती करण्यात आली. यावेळी




वासवी मातेच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकणारे अनेकांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नांदेड येथील वासवी माता मंदिर उभारणीस देणगी दिलेले आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास दमकोंडवार यांचा सपत्नीक सन्मान चिन्ह देऊन शिरीष मनाठकर,जिल्हाध्यक्ष प्रभाकर पत्तेवार, मुख्य सलागार डॉ. संजय पलीकोंडावार ,प्रसिद्धीप्रमुख सुनील व्यवहारे, महिला महासभेच्या दिपा गंधेवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या कार्यकारणीत मागील सहा वर्षांपासून राहून यावेळी स्वतः न राहता दुसऱ्यास प्रतिनिधित्व दिल्याबद्दल राजेश्वर रायेवार यांचा सत्कार डॉ. पि.टी. मुक्कामावर,विलास व्यवहारे ,डॉ. गोकुळ चक्करवार, यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी सर्व समाज बांधवांना वासवी मातेच्या प्रतीमेचे फोटो फ्रेम आर्य वैश्य समाजाच्या वतीने वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रस्तावना, जिल्हाध्यक्ष प्रभाकर पत्तेवार यांनी केले तर मनोगत डॉ. संजय पलीकोंडावार यांनी मानले. या कार्यक्रमास आर्य वैश्य समाज बांधव महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. अल्पपोहारानंतर कार्यक्रमात सांगता करण्यात आली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यसाठी अनिल प्रतापवार,मनोज करचलवार, डॉक्टर मामीडवार, सुरेश तुप्तेवार , गजानन रेवणवार,सुर्यकांत मुक्कावार, विजय व्यवहारे, प्रशांत मुक्कावार आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात सर्व समाज बांधव व भगीणी तसेच वासवी क्लबचे सदस्य ,आर्य वैश्य महासभेचे सर्व पदाधिकारी या सर्वांनी उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास दमकोंडवार यांनी मानले. पुढील वर्षीची वासवी मातेची जयंती आपल्या नवीन आर्य वैश्य मंगल कार्यालय करू असा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

### नांदेड येथील युवा पत्रकार मुबीन कामरानी यांचे निधन.

**नांदेड**-येथील तरुण आणि प्रसिद्ध पत्रकार आणि मेरी आवाज न्यूज या युट्यूब चॅनलचे संपादक मुबीन कामरानी यांचे सोमवारी रात्री निधन झाले. ते बऱ्याच दिवसापासून कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराने ग्रस्त होते आणि गेल्या अनेक महिन्यांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्यावर नांदेड, हैदराबाद आणि मुंबई येथील विविध रुग्णालयात उपचार करण्यात आले, परंतु आजारात कोणतीही लक्षणीय सुधारणा झाली नाही. गेल्या तीन ते चार दिवसांपासून त्यांच्यावर नांदेड येथील शिवस श्वास रुग्णालयात उपचार सुरू होते,



जिथे ते व्हेंटिलेटरवर होते. अखेर, सोमवार, ५ मे रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास त्यांचे निधन झाले, त्यांची अंत्ययात्रा मंगळवार, ६ मे रोजी ५ वाजता असरच्या नमाजानंतर गाडीपुरा येथील बडी दर्गा मशिदीत अदा करण्यात आली आणि त्याच्या शेजारील कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला. या वेळी विविध क्षेत्रातील शेकडो लोक उपस्थित होते. दिवंगत मुबीन कामरानी यांनी मेरी आवाज न्यूज या युट्यूब चॅनेलद्वारे अल्पावधीतच पत्रकारिता क्षेत्रात एक अनोखा ठसा उमटवला. त्यांच्या निधनाने नांदेडच्या पत्रकार क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुले, पत्नी, आई वडील, पाच भाऊ, दोन बहिणी इत्यादींचा समावेश आहे.

# शंतनु क्षिरसागर विज्ञान शाखेतुन प्रथम तर कला शाखेतुन ऋतुजा शेटे प्रथम

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ०७ मे-**

फेब्रुवारी मार्च २०२४- २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे ईयत्ता बारावी विज्ञान व कला शाखेच्या परीक्षेत महात्मा गांधी जुनियर कॉलेज मुदखेड च्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी ९२ टक्के एवढे गुण घेवून ऊत्तुंग अशी भरारी घेतली असुन त्यांनी आपल्या यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे



शंतनु क्षिरसागर | समिक्षा सुर्शवंशी | ऋतुजा शेटे | जयदेव पवार

महात्मा गांधी जुनिअर कॉलेजचे एकूण विद्यार्थी विद्यार्थिनी २५६ परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी विशेष प्राविण्यसह आठ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर ३१ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये आले आहेत

त्यापैकी कला शाखेचे १६० विद्यार्थी विद्यार्थिनी परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी १४८ विद्यार्थी विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत तर विज्ञान शाखेचे ८२ विद्यार्थी विद्यार्थिनी परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी ८१ विद्यार्थी विद्यार्थिनी पास झाले आहेत विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९८.७८ एवढा लागलेला आहे तर कला शाखेचा एकूण निकाल ९२.५०एवढा लागलेला आहे

कला शाखेतून ऋतुजा अनिल शेटे हिने ८९.६७ एवढे गुण घेवुन प्रथम क्रमांक मिळविला आहे तर द्वितीय क्रमांक प्रतीक्षा राठोड हिने ७९.७६गुण मिळविले आहेत तिसरा क्रमांक प्रिती कोंडीबा निखाते हिने ७८.८३ टक्के गुण मिळविले आहेत तर विज्ञान शाखेत पहिला क्रमांक क्षिरसागर शंतनु रविंद्र याने ७२.१७% टक्के तर दुसरा पवार जयदेव भगवानराव याने ६३.१७% टक्के तसेच तिसरा समिक्षा सुर्यवंशी ६२.१७% टक्के गुण प्राप्त केले आहेत.

यशस्वी झालेल्या मुला मुलींनी आपल्या यशाचे श्रेय आई वडील आणि प्राचार्य तसेच सर्व मार्गदर्शन करणारे शिक्षक प्राध्यापक यांना दिले आहेत.

यशस्वी झालेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींचे अभिनंदन महात्मा गांधी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राम चौधरी, सचिव लक्ष्मण सोनटक्के, उपाध्यक्ष रामप्रसाद सोनी, कोषाध्यक्ष शंकररावजी पचलींग, शिक्षक प्रतिनिधी किरण देशपांडे, प्राचार्य बाबुराव नाईक, उपप्राचार्य अभया लोहगावकर, शिक्षक नेते यशवंत कांबळे, कार्यालयीन अधीक्षक रघुनाथ मिटके, प्राध्यापक ज्ञानेश्वर गरुडकर, प्राध्यापक दिनेश शेटे,प्राध्यापक सूर्यकांत गौंड, प्राध्यापक मंगनाळे दत्ता, प्राध्यापक अमृत जाधव, प्राध्यापक प्रेम कुमार कौशल्य, प्राध्यापक त्र्यंबक अन्नलदास, प्राध्यापक ईजेवाड, प्राध्यापक कदम, प्राध्यापक गिरी, प्राध्यापक मोरे अलका, ग्रंथपाल सुनिता भोनगिनवार, वरिष्ठ लिपिक चंद्रकांत वाघमारे, लिपिक सुप्रिया डुडूळे, धर्माजी पल्लेवाड, विजय वाढे, कार्तिक वडे, इत्यादी सह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विशेष अभिनंदन केले आहे.

# कृषीपदवीधारकांना पशुधन विकास अधिकारी पदासाठी पात्रता द्यावी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ०७ मे-**

केंद्रीय लोकसेवा आयोग पश्चिम बंगाल आणि उत्तराखंड राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात सुद्धा कृषी पदवीधारकांना पशुधन विकास अधिकारी पदासाठी पात्रता द्यावी अशी मागणी किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी राज्याच्या पशुसंवर्धनमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्याकडे पत्र देऊन केली आहे.

आमदार भीमराव केराम यांनी पत्रात नमूद केले आहे की सध्या महाराष्ट्र राज्यात पशुधन विकास अधिकारी पदासाठी फक्त पशुवैद्यकीय पदवीधर पात्र आहेत. परंतु इतर राज्यांमध्ये विशेषता केंद्रीय लोकसेवा आयोग पश्चिम बंगाल आणि उत्तराखंडमध्ये कृषी पदवीधरांना पशुधन विकास अधिकारी पदासाठी पात्रता देण्यात आली आहे. आजच्या बदलत्या कृषी व पशुपालन व्यवस्थापन कृषी पदवीधारकांनाही पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय, गोठा व्यवसाय, पशुखाद्य उत्पादन, जनावरांचे आरोग्य व्यवस्थापन आदि महत्त्वाच्या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट ज्ञान व कौशल्य प्राप्त झाले आहे. कृषी अभ्यासक्रमात या संदर्भातील विविध

### आ.भीमराव केराम यांचे पशुसंवर्धनमंत्री पंकजाताई मुंडेना पत्र



विषयांचा समावेश असल्याने कृषी पदवीधर तत्सम कृषी व इतर संलग्न पदव्या जसे की बीएससी कृषी जैवतंत्रज्ञान,बीएससी कृषी व्यवसाय व्यवस्थापन,बीएससी गृहविज्ञान,बी टेक अन्न तंत्रज्ञान,बीएससी उद्यानविद्या व तत्सम पदवीधर सुद्धा हे काम प्रभावीपणे पार पाडू शकतात.त्यामुळे केंद्रीय लोकसेवा आयोग पश्चिम बंगाल आणि उत्तराखंड राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात देखील पशुसंवर्धन विभागाला अधिक कार्यक्षम व प्रशिक्षण प्राप्त उमेदवार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तसेच पदवीधरांना शासकीय सेवेतील नव्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यात सुद्धा कृषी पदवीधारकांना पशुधन विकास अधिकारी पदासाठी पात्रता द्यावी अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी पंकजाताई मुंडे यांच्याकडे केली आहे.




**नांदेड - भारताने पाकिस्तानवर एअर स्ट्राइक करून दहशतवादी अड्ड्यांचा खात्मा केला आहे. युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने नांदेड रेल्वे स्थानकावर मॉंक ड्रिल घेण्यात आले आहे. पर्यटक व रेल्वे प्रवाशाच्या दृष्टिकोनातून मॉंक ड्रिल घेण्यात आले. लोहमार्ग पोलीस नांदेड पोलीस व एटीएस, क्यूआरटीचे अधिकारी, शानपथक फायर ब्रिगेड यांनी संयुक्तपणे हे मॉंक ड्रिल केलेले आहे. प्रवाशाला या मॉंक ड्रिलची पूर्वकल्पना देण्यात आली होती. मॉंक ड्रिलचा थरार प्रवाशांनी यावेळी अनुभवला.**

# चार वर्षापासून वारसा फेरफार अडवला

## मानसिक त्रासामुळे जेष्ठ नागरिक दवाखान्यात दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०७ मे-**

देगलूर तालुक्यातील वन्नाळी महसूल सध्याचे तलाठी व मंडळ अधिकारी यांनी वारसा हक्काने शेतीचा फेरफार मागील चार वर्षापासून प्रलंबित ठेवून त्रास दिल्यामुळे जेष्ठ नागरिक मारुती पाटील यांना मानसिक त्रास झाल्याने त्यांची तब्येत बिघडल्याने त्यांना दवाखान्यात दाखल करावे लागले आहे त्यांच्या जीवितास धोका झाल्यास संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी बालाजी जबाबदार राहतील अशी तक्रार यांचे चिरंजीव पांडुरंग पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

देगलूर तालुक्यातील पांडुरंग मारुती पाटील यांनी चार वर्षांपूर्वी त्यांचे वारसा हक्काप्रमाणे आईचे मृत्युपत्र दाखल करून शेत जमीन फेरफार करण्यासाठी अर्ज वन्नाळी सज्जाचे तलाठी बोलसुरे यांच्याकडे केला होता. या फेरफार अर्जावर त्यांचे भावाने आक्षेप घेतल्याने विवादग्रस्त प्रकरण-६ (अ) मध्ये समावेश करण्यात आला होत. परंतु दोन्ही भावांमध्ये सामंजस्य निर्माण होऊन ते प्रकरण थांबविले होते. असे असताना वनाळी सज्जाचे तलाठी बोलसुरे व मंडळ अधिकारी बालाजी पुष्पलवार यांनी चार वर्षापासून फेरफार कोणतीही सुनावणी न घेता फेरफार अडवला आहे. याबाबत पांडुरंग पाटील यांचे पिता ज्येष्ठ नागरिक मारुती पाटील यांनी पाठपुरावा केला असता देगलूर तहसील कार्यालयातील लिपिक गणेश पाटील यांनी प्रकरण हे मंडळ अधिकारी शहापूर बालाजी पुष्पलवार यांच्याकडे गेले असल्याचे सांगितले. परंतु पुष्पलवार यांनी हा विषय न्यायप्रविष्ठ असल्याचे सांगत सुक्त अवस्थेत गेल्याचे सांगून तुमचे काम होऊ देणार नाही असे धमकावले होते.

# नायगांव येथील कृषीमहाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची साईकृपा दूध डेअरीस भेट

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ०७ मे-**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि महाविद्यापिठ परभणी अंतर्गत येणाऱ्या नायगांव कृषी महाविद्या लयातील विद्यार्थांची उमरी येथील साईकृपा दूध डेअरी ॲण्ड फुड प्रोडक्सला भेट दिली

काळाच्या ओघात आजचा प्रत्येक विद्यार्थी हा शालेय शिक्षणा बरोबरच व्यवसायिक शिक्षणाकडे अधिक लक्ष देत तो एक उत्तम उद्योग व्यवसायाकडे वळून तो उत्कृष्ट व्यवसायिक बनावा ह्या दृष्टिकोनातून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी महा विद्यापीठ परभणी अंतर्गत नायगांव येथील कृषीमहाविदयालयातील दुध व दुग्धजन्य विभाग प्रमुख डॉ. आचल शंभरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी महाविद्यालयातील विद्यार्थी




विद्यार्थीनी आपल्या आठव्या सत्रातील अनुभव प्रशिक्षण या कार्यक्रमा अंतर्गत दि.६ मेरोजी उमरी येथील साईकृपा दूध डेअरी भेट दिली असता या येथील व्यवस्थापक मनोहर लोमटे यांनी डेअरी फार्म मधिल वेगवेगळ्या प्रकारच्या दुधा पासुन दुग्ध पदार्थ बनविण्यासाठी लागणारी साधन सामग्री (मशिनरी) मानवी आरोग्यास दुधा पासुन विविध दूग्धजन्य पदार्था विषयी विद्यार्थ्यांना यावेळी माहिती दिली. या उत्तम मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले.

यावेळी नायगांव कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. नादरे, उपप्राचार्य डॉ. एन. बी. घुबे, प्रा. एस. सी. नागनीकर व विद्यार्थीनी कुमारी धारणा मादसवार, समता बच्चलकुरा, ऋतुजा भोसले, रोहिणी गवंदे, वैष्णवी जाधव,साक्षी कदम, सपना कोंपल वाड ,कल्याणी मडावी, तनूश्री मानापुरे ,वैभव भड,विनय चिंचोरे, कौस्तुभ देशमुख, विकास ढगे,विश्वजीत चिंचोलकर, बाबाराव धोंडे , शैलेष गोरख , रवि गिरी, कृष्णा कदम, गोपाल फुलसुंदर, यश घोंगडे अमोल काडभाने, कौशिक खिल्लारू, राहूल जाधव, शुभम मानमोडे यावेळी प्राध्यापक वृंद,विद्यार्थी व विद्यार्थिनीची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# श्रद्धा मादसवार विज्ञान शाखेतून तालुक्यात प्रथम



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ०७ मे-**

तालुक्यातील कु. श्रद्धा वेंकट मादसवार हिने इयत्ता १२ वी विज्ञान शाखेच्या परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून गावाचे नाव उज्वल केले आहे. तिच्या या उत्कृष्ट यशाबद्दल आमदार भिमराव केराम यांच्या हस्ते त्यांच्या निवासस्थानी नुकताच सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी कु. श्रद्धाच्या यशाचे सर्वांनी कौतुक केले. आमदार भिमराव केराम यांनी तिला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देताना म्हटले, श्रद्धाच्या या यशाने तालुक्याचा गौरव वाढला आहे. तिच्या मेहनतीचे आणि समर्पणाचे हे फळ आहे. तिला भविष्यातील सर्व क्षेत्रांत यश मिळो.

सत्कार कार्यक्रमाला भाजपाचे नेते सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, किनवट मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनिवार, सागर पिसारीवार, माजी नगरसेवक नरेंद्र सिरमनावर, माजी नगरसेवक शिवाजी आंधळे, संतोष म्हरसकोल्हे, वेंकट मादसवार, राहुल दारगुलवार, सुधाकर अगुलवार आणि पत्रकार, मधुकर अन्नेलवार, कचरू जोशी उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही तिला प्रेरणादायी संदेश देत भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.